प्रकाशन



कल्याण इनामदार


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय नाटक
दा.क्र. १८५९१

IRBK-0118791

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ९८७८१ नों. दि १.७.५९
वि. नाटक, क्र. ....................

# ' सदा गबाळे '

— लेखक —

## कल्याण इनामदार

IRBK-0118791
IRBK-0118791

श्रद्धा प्रकाशन

मुंबई — ४०००२८

● कल्याण इनामदार

● प्रथमावृत्ती- १९७९

● प्रती ११००

● मुखपृष्ठ- श्री. कमलाकर गोंजी

नाट्यपरीक्षण मंडळाचा क्रमांक
टी. एम्. एस्. ५३/७६

मूल्य- ८-०० रुपये

मुद्रक -
अमित प्रिंटर्स,
डोंबिवली

प्रकाशक-
सौ. श्रद्धा इनामदार
२/३५ इलम महाल
रा. ब. सी. के. बोले रोड,
दादर, मुंबई-२८

**कल्याण इनामदार यांची आगामी प्रकाशने**

१) हा गंध वासनेचा (नाटक)
२) दहा दाल्ल्याची बायको (लोकनाट्य)
३) एक मुका लाख चुका (फार्स)
४) आणि ती पुन्हा भेटलीच नाही ! (कादंबरी)
५) स्मृतिगंध काव्य-संग्रह

ती. नाना व सौ. आई
यांच्या स्मृतीस

# ★ सदा गबाळे ★

'सदा गबाळे' हे लोकनाटच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून मिळालेल्या अनुदानाच्या मदतीने छापले आहे. लेखक व प्रकाशक हे या आर्थिक मदतीबद्दल त्यांचे सदैव ऋणी रहातील.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १८७९ ... दि ९.७.१९.९७..
वि. नाटक ..... क्र. ... ..............

# मनोगत

नमस्कार !

आज ‘ सदा गबाळे ’ हे माझे लोकनाटय पुस्तक रुपानें आपल्या समोर सादर करताना मला मनस्वी आनंद होत आहे. वगसम्राट श्री. दादु इंदूरीकर यांच्या जीवनातील एका हृदयस्पर्शी प्रसंगातून या लोकनाटयाच्या कथेचा जन्म झाला आहे. हे लोकनाटय ‘ इच्छाशक्ती ’ या आमच्या संस्थेतर्फे सादर करण्याकरिता दिग्दर्शक श्री. जयदेव हट्टंगडी यांनी घेतलेले अथक परिश्रम माझ्या सदैव स्मरणात राहतील. संगीत दिग्दर्शक श्री. विठ्ठल शिंदे यांनी या लोकनाटयाला दिलेले संगीत आजही रसिक प्रेक्षकांच्या मनात गुणगुणले जात आहे. सर्व मराठी वृत्तपत्रांनी या लोकनाटयाची मुक्तकंठाने प्रशंसा करून या लोकनाटयाच्या यशाची पोचपावती दिल्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. या लोकनाटयाला १९७७ चे सर्वोत्कृष्ट लोकनाटयाचे ‘ नाटयदर्पण मानचिन्ह ’ मिळाल्यामुळे मला श्रमसाफल्याचा आनंद उपभोगता आला आहे.

या लोकनाटयाच्या यशात काम करणाऱ्या सर्व कलावंतांचा व तंत्रज्ञांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे सहकार्य माझ्या उद्याच्या वाटचालीची शिदोरी आहे.

पुस्तकरुपाने हे लोकनाटय लवकरात लवकर छापून देण्यासाठी 'अमित प्रिंटर्स' डोंबिवलीचे मालक श्री. व सौ. देशपांडे यांनी खूपच मेहनत घेतली आहे. मुखपृष्ठ सजावट श्री. कमलाकर गोंजी यांच्या कल्पक कुंचल्यातून साकार झाली आहे.

प्रकाशन कार्यासाठी लागणारे सर्व प्रकारचे मार्गदर्शन 'भक्तिसंगम' मासिकाचे संपादक श्री. सुधाकर सामंत यांनी गुरुबंधुच्या नात्याने केलेले आहे. त्यांचे आभार कसे मानायचे ? हे लोकनाटय उभे करण्यासाठी ज्यानी ज्यानी म्हणून मला मदत केली त्यांचा मी सदैव ऋणी आहे.

मधु कडू यांनी रंगमंचावर उभा केलेला 'सदा गबाळे' अमर आहे. तो उद्या पुन्हा आपल्या सेवेला हजर करण्यासाठी मला आपले आशिर्वाद हवे आहेत.

— कल्याण इनामदार

# प्र स्ता व ना

गेल्या चाळीस वर्षापासून तमाशा माध्यमाद्वारे मी मराठी मनाचं मनोरंजन करीत सारा महाराष्ट्र फिरत आलो आहे. आज तमाशा हेच माझें जीवन झाले आहे. आजपर्यंत रसिक प्रेक्षकांनी माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला परंतु त्यामानाने लक्ष्मी मात्र सतत माझ्यापासून दोन हात दूर राहिली. तिच्या मिळालेल्या थोड्याबहुत आशिर्वादाने मी माझा स्वत:चा फड उभा करून स्वत:च्या पायावर उभा राहिलो न राहिलो तोच नियतीच्या क्रूर चेष्टेने माझे सारे मनोराज्य उध्वस्त केले. सातारा जिल्ह्यातील पालीच्या खंडोबाच्या यात्रेत मी माझा फड घेऊन गेलो होतो, खेळात रंग भरत असतांनाच रंगाचा बेरंग झाला आणि समाजकंटकांनी माझ्या तंबूला आग लावून दिली. साऱ्या वैभवाची राख झाली. साथी सोबती आल्या वाटेने परत गेले आणि मी उघड्यावर पडलो.

श्री. कल्याण इनामदार यानी या माझ्या जीवनाच्या शोकांतिकेला आपल्या कल्पक बुद्धीने 'सदा गबाळे' या लोकनाट्यात साकार केले आहे. सदा गबाळेच्या प्रथम प्रयोगाच्या वेळी मुंबईच्या शिवाजी मंदीरात मी प्रमुख पाहुणा

म्हणून हजर होतो. जेव्हा पडदा बाजूला झाला, तेव्हा माझ्या गतकालच्या जीवनाचे खरेखुरे दर्शन मला झाले व डोळे आपोआपच पाण्याने भरून आले. सदा गबाळे या लोकनाट्याची मांडणी करताना लेखकाने परंपरेच्या काही मर्यादा ओलांडल्याचे ध्यानात येते. गण, गौळण, बतावणी व वग यांचा क्रम या लोकनाट्यात वेगळ्या पद्धतीने सादर केला गेला आहे.

या प्रस्तावनेच्या अनुषंगाने एवढेच सांगावेसे वाटते की आज जी कलाक्षेत्रातली गुरुपरंपरा लोप पावत चालली आहे तिचे साऱ्यांनीच जतन केले पाहिजे. वयाच्या दहाव्या वर्षी माझ्या वडिलांनी शिकविलेले गुरुवर्य पट्ठेबापूरावांचे गाणे मी एकदा गात होतो. माझ्या सुदैवाने ते गाणे ऐकण्यासाठी पट्ठेबापुराव हजर होते. गाणे संपल्यावर ते माझ्याजवळ आले व त्यांनी मला विचारले की, 'हे गाणे तुला कोणी शिकविले ?' मी म्हणालो 'माझ्या वडिलानी— श्री. राघु इंदुरीकरानी.' त्यानी पाठीवर हात फिरवून मला आशिर्वाद दिला की 'तू भविष्यात मोठा तमासगीर होशील.' आज त्यांच्या आशिर्वादाला फळ आले आहे. श्री. कल्याण इनामदार यांच्याकडून जनतेची अखंड सेवा होत राहो असा मी त्यांना आशिर्वाद देतो.

**दादू इंदुरीकर**

# दोन शब्द

आमच्या 'महाराष्ट्र–दर्शन' साप्ताहिकातून 'मुशाफिरी' लिहिणारे आमचे साहित्यिक मित्र श्री. कल्याण इनामदार यांचे हे पुस्तक, या पुस्तकात दोन शब्द लिहिताना आनंद होत आहे. इनामदारांच्या लेखनाचा बाज अस्सल सातारी घाटणीचा आणि त्याचे प्रत्यंतर आपणास या लोकनाटचात जागोजागी जाणवेलच. या लोकनाटचाद्वारे श्री. इनामदारांनी व्यक्त केलेले एका कलावंतांचे जीवन त्याची परिस्थिती, कलेशी त्याचं जडलेलं नात आणि त्यातून घडणारा अविष्कार त्याचे इतरत्र उमटलेलं साद--पडसाद सारं सारं काही वेगळच वाटत.

महाराष्ट्रात लोकरंजनातून लोकशिक्षण देण्याचे लोकनाटचाचे माध्यम बऱ्याच वर्षांपासून चालत आलेले आहे. परिस्थितीनुसार त्याच्यात थोडचा-फार प्रमाणात बदल झाले पण कार्यात मात्र बदल झाला नाही. उलट अधिकच वाढ झाली आणि त्याचे प्रतिबिंब इनामदारांच्या लेखणीतून सातत्याने दिसून येते. य त विनोद आहेच, लावणीची बरसात आहे, समर्थ कथानक आणि त्यास साकारणारी पात्रही आहेत. ठसठशीतपणाही आहे. एकीकडे उद्यान गणेश गीतेसारखे आध्यात्मिक गीतसंग्रह लिहिणारे इनामदार तर दुसरीकडे 'सदा गबाळे' सारखे मर्मभेदी आणि मनाला चटका लावणारे इनामदार अशी दोन्हीही रूपे समर्थ वाटतात. आणि या समर्थपणाचा अभिमान वाटतो. त्यांनी यापुढेही अशीच पुस्तके लिहावीत व लोकजीवन समृद्ध करण्यास मदत करावी हीच इच्छा.

—सुधाकर सामंत

## महाराष्ट्रातील मान्यवर वृत्तपत्र टिकाकारांच्या कसोटीतून सदा गबाळेचे झालेले मूल्यमापन.

१) बंदिस्त-रेखीव प्रयोग 'सदा गबाळे' – लोकसत्ता

२) प्रभावी कथा असलेले रंगतदार वगनाट्य 'सदा गबाळे' – नवाकाळ

३) चांगली रंगत असलेले रहस्यमय वगनाट्य 'सदा गबाळे' – नवशक्ति.

४) मधू कडूच्या धमाल अभिनयाने रंगलेले 'सदा गबाळे' – मुंबई सकाळ

५) मधूची उत्तम भूमिका असलेले रंजक वगनाट्य 'सदा गबाळे' – मराठा

६) बंदिस्त, करमणूक प्रधान लोक-नाटक 'सदा गबाळे' – आरोळी

७) 'सदा गबाळे' लोक-नाटकाचा एक चांगला प्रयोग – झूम

८) संगीताने सजलेले लोक नाट्य 'सदा गबाळे' – रसरंग

९) 'सदा गबाळे' जे काही आहे ते प्रेक्षकांनी एकवेळ जरूर पहावे – सोबत

१०) कलाकारांची रेखीव कामे असलेले बंदिस्त वगनाट्य 'सदा गबाळे'
– महाराष्ट्र टाईम्स

या लोकनाटचासंबंधीचे सर्व हक्क लेखकाकडे आहेत. आगाऊ लेखी परवानगीशिवाय या लोकनाटचाचा कोणीही प्रयोग करु नये.

तालमीना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि परवानगी मूल्य या संबंधात श्री. कल्याण इनामदार, २।३५ इलम महल, रा. ब. सी. के. बोले रोड, दादर मुंबई ४०००२८ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा '

**–कल्याण इनामदार**

# ‘ सदा गबाळे ’

लेखक– कल्याण इनामदार

या लोकनाट्याचा पहिला प्रयोग ‘इच्छाशक्ती’ मुंबई या संस्थेने मंगळवार दिनांक २३–३–१९७६ रोजी शिवाजी मंदिर मुंबई येथे सादर केला.

संगीत – विठ्ठल शिंदे

दिग्दर्शक – जयदेव हट्टंगडी

नेपथ्य – दत्ता चौंडणकर

पार्श्वगायिका – उषा राठोड

प्रकाश योजना – प्रफुल्ल संघाणी

ढोलकी – रमेश लाखण

## क ला का र

सदा गबाळे– मधु कडू

छगन– सखाराम कोटकर

प्रवासी– संपत कडू

कल्पना– वैजयंता पाठारे

सगन– कमलाकर पाटील

गबरु– सदा लवटे

रंगराव– मोहन पाटील

दौलतराव– शंकर तोडकर

गोडबोले– किशोर नांदलस्कर

घोरपडे– बाळ घडशी

सत्यशोधक– शाहीर–मधु मोरे

म. ग्रं. सं. मो. वाचनालय शाखा.
दा. क्र. १८७०९ ... दि. १.११.६९.
वि. नाटक

# अंक १ ला

(जेव्हा स्टेजवरून पडदा बाजूला सरतो तेव्हां प्रेक्षकांच्या पुढे एका रस्त्याचे चित्र उभे रहाते. हा मुंबई-पुणे मार्गाचा एक भाग आहे, अशी कल्पना आहे. क्षणार्धात लोकनाटयाचा नायक सदा गबाळे हातात लाल रंगाचा डबा व ब्रश घेऊन प्रवेशतो. तो स्टेजच्या मध्यावरील एका दगडावर एक लाल त्रिकोण रंगवितो पण हे कार्य करीत असताना तो मनातून वैतागलेला आहे.

हा एके काळचा वैभव संपन्न असा लोकनाटयाचा नायक आहे. त्याचा स्वतःचा फड होता. पण हा कलाकार एक दिवस दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडतो. खंडोबाची पाली येथे यात्रा होती. सदा गबाळे आणि पार्टीचे लोकनाटय लोकांच्या चर्चेचा विषय झाला होता. रात्रीचा खेळ सुरू होऊन गण गोळण रंगात येत होती तोच सदाच्या हितशत्रूंनी तंबूला आग लावली क्षणार्धात सदाचं सारं वैभव भस्मसात झालं. चारा संपल्यावर उडून जाणाऱ्या रानपाखराप्रमाणे सदाचे सारे साथीदार दाहीदिशांना विखुरले गेले. सदा संपला. शेवटी अनंत प्रयत्नानंतर जुन्या ओळखीच्या आणि प्रशस्तीपत्रकांच्या सर्टिफिकेटवर सदाला कुटुंब नियोजनाच्या खात्यात समाज कल्याण मंत्र्यांनी नोकरी दिली. सदा आज त्याच कामाचा पाठपुरावा करीत आहे. पण तो या कामात एकरुप झालेला नाही. शेवटी डब्यात शिल्लक राहिलेला रंग तो एका दगडावर ओतून देतो. हातातला रंगाचा डबा व ब्रश दूर भिरकावतो. आणि सरते शेवटी लोकशाहीर सह्याद्रीला उद्देशून आपले मनोगत व्यक्त करू लागतो.)

सदा– बा सह्याद्री मी कोण ? असून नसलेला एक त्रिकोण. कुण्या अज्ञात जन्मदात्याच्या आठवणीची खूण रंगवतो. आहे लाल त्रिकोण. ए, तुला ऐकू

येत नाही कारं ? आन समज जर येत असलं, तर मला तुझ्याशी थोडं बोलायचय. मला वाटतंय तुलासुद्धा मन असावं कारण आज साऱ्यांचीच मन कशी दगडाची झालेली हायती. अन् काय र ? ती त्यांनी तुझ्यापासून तर मागून घेतलेली न्हाईत ना ? आन् जर तसं असेल तर, माझं ....
माझं बी मन दगडाचं करून टाक म्हनजे जुन्या आठवणींच्या माऱ्यापासून माझी सुटका हुईल. कदी कदी वाटतं, मी माझ्या साऱ्या लावण्या गण, गौळण तुला ऐकवल्या असत्या तर तुझ्या पाषाण रुपातून माझ्यासाठी मायेची गंगा नक्कीच वाहिली असती. तुझ्या कुशीत इसावलेल्या या दगड-धोंड्यानी माझ्याशी चार गप्पा-गोष्टी केल्या असत्या. पाताळापर्यंत पोचलेल्या तुझ्या या दऱ्यानी निदान मला सामावून तरी घेतलं असतं. म्हनून म्हनतो, या शाहीराच्या कविमनाला तुझ्या पायी तुडवून टाक. त्याचा पार चेंदामेंदा कर. म्हनजे माज्यातला मानूस मरून जाईल. अन् मानसाच्या आकाराचा, एक पशू या जगात जगायला मोकळा हुईल.

पन मी म्हनतो, तुला तरी हे सारं का सांगायचं ? कालपर्यंत साऱ्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जावून, या सदा गबाळ्यानं साऱ्यांना गदागदा हसवलं. जनतेला जनार्दन मानून तिची सेवा केली, त्याच जनतेनं मला आज पायदळी तुडवलं. ज्याच्यासाठी निवडणूकीचा प्रचार केला ते मंत्री झाले. आन आज, मी मात्र कुनाला किती असावीत, पहिल्यात आन दुसऱ्यात किती अंतर असावं, कायमचं कुटं थांबावं, याचा पाढा गात या मैलापासन त्या मैलाकडं चाललो आहे.

ठीक आहे. म्हनत्यात ना ऐकावं जनाचं आन् करावं मनाचं. हेच खरं चल सदा गबाळ्या, या घटकेपासन हे रंगाऱ्याच काम बंद करायचं.माझं ऐक ह्यो शिल्लक राहिलेला रंग या दगडावर ओतून दे, या ब्रशाला कायमचा रामराम ठोक. अन् उरलेलं सारं आयुष्य मृत्यू येईपर्यंत या सह्याद्रीच्या कड्या कपाऱ्याना लावण्या आन गवळणी ऐकवत खर्ची घाल.

(असे म्हणून तो डब्यात शिल्लक राहिलेला रंग एका दगडावर ओतून देतो. ब्रश व डबा दोन दिशाना फेकून देतो. व सुन्न मनाने खाली मान घालून रस्त्यावर बसून रहातो. तोच कुणी एक प्रवासी वाटेने येतो. सदाने दगडावर, ओतलेला लाल रंग बघून तो प्रवासी त्या दगडाला नमस्कार करतो. सदाला

जेव्हा या वाटसरूची चाहूल लागते तेव्हा तो प्रवासी त्या दगडाचे दर्शन घेत असतो. दर्शन घेऊन झाल्यावर सदाला तो काही शंका विचारतो.)

**प्रवासी–** रामराम पाहुणं ! नाही म्हटलं या देवाचं नाव काय ?

**सदा–** कोणत्या ?

**प्रवासी–** ह्या.. ह्या. देवाचं.

**सदा–** ह्या देवाचं नाव होय. एक भला, चांग भला. हा स्वर्गातून आत्ताच आला.

**प्रवासी–** एक भला ? चांग भला ? हा कोणता देव ?

**सदा–** तुम्हाला माहीत नाही ? अहो ही माण देशातल्या धनगरांची प्रसिद्ध देवी म्हाकुबाई...

**प्रवासी–** म्हाकुबाई ! नाव कुठंतरी ऐकल्यासारखं वाटतं.

**सदा–** अहो, हीच दुसरं नाव मायाअक्का. हे फार कडक देवस्थान आहे. घाटमाथ्यावरच्या भक्ताना दर्शन देण्यासाठी हिने हे स्वयंभूस्थान धारण केलं आहे. हे फार जागृत देवस्थान आहे. ही गोरगरीबांच्या नवसाला फार पावते.

**प्रवासी–** आपण कोण ?

**सदा–** मी सदा गबाळे, मी साताऱ्याकडचा कालराती ही म्हाकुबाई माझ्या सपनात आली आन म्हनाली— सदा, मी घाटमाथ्यावर येणार आहे. तू माझ्या सेवेला हजर हो.

**प्रवाशी–** म्हणजे देवी तुमच्याशी बोलली ?

**सदा–** आव, बोलली म्हणजे काय ? चक्क बोललीच. म्हणून तर मी इथं आलो. पावन तुमचा काही नवस बिवस आसल तर मला सांगून ठेवा हं ! मी सांगेन देवीला.

**प्रवासी–** खरं म्हणता ?

**सदा–** खोट आपला बा सुदीक कंदी बोलला नव्हता. तुमी नुसता मला, तुमचा नवस सांगा. देवीन पुन्हा मला दर्शन दिलं की मी तिला तुमच्या नवसाबद्दल अक्षी डिटेल मंदी सांगेन.

**प्रवासी–** मग तर फारच छान झालं. तुमच्या रुपाने मला माझे भाग्यच भेटले म्हणायचे.

**सदा–** मग काय काय कमी आहे तुम्हाला ?

प्रवासी– अहो, अधिक काहीच नाही.

सदा– मग उणं काय काय आहे, ते सांगून टाका म्हणजे आपन भर घालून टाकू.

प्रवासी– पहिली गोष्ट म्हणजे माझी बायको सरळी वागत नाही.

सदा– कुणाशी ?

प्रवासी– अहो कुणाशी म्हणजे ? माझ्याशी.

सदा– सध्या कुठ हाय ती ?

प्रवासी– पळून गेली.

सदा– कुणा बरोबर ?

प्रवासी– कुणा बरोबर नाही. माहेराला.

सदा– अस्स होय, मग असू द्या.

प्रवासी– दुसरी गोष्ट म्हणजे मला अजून मूल नाही.

सदा– अहो मूल एकटयाला कसं होईल ?

प्रवासी– काय राव वाटेल ते काय बोलता ?

सदा– अहो, मला म्हनायचाय, बायको माहेरी असल्यावर तुम्हाला एकटयाला मूल कसं होईल ? मुल व्हायचं म्हणजे बायको घरात नको का ?

प्रवासी– ती पायझेच.

सदा– तेच म्हणतोय मी. तुमी उगीच पांडवप्रताप मनात आणताय. तुमी आता असं करा तुमचं सार नवस मला सांगून टाका. आणि ते नवस पूर्ण करण्यासाठी देवीला एक ओटी, पांच नारळांचं एक तोरण, आणि सव्वा अकरा रुपये रोख माझ्याजवळ देऊन ठेवा. देवीची आन माझी पुन्हा जेव्हा एकांतात गाठ पडेल तेव्हा तिला मी तुमच्या नवसाबद्दल सारं काही समजावून सांगेन तुमी माझ्यावर विश्वास ठेवून बरोबर एक वर्षाने जोडीनं इथं देवीच्या दर्शनाला या. येताना देवीचा प्रसाद कडेवर घेऊन या. मी इथंच आहे.

प्रवासी– अहो, पण मी आत्ता ओटीचं सामान वगैरे काही आणलेलं नाही. मला काय माहित इथं असा चमत्कार घडणार आहे तो.

सदा– मग असं करा. रोख रुपये एकवीस आत्ता मला द्या. मी तेवढयावर

देवीची समजूत घालतो. पुना जवा कोकर जत्रा घेऊन याल तवा सगळं काही वैजवार घेऊन या म्हणजे झालं.

**प्रवासी–** ठीक आहे. अहो माझ्या मनातल्या ह्या साऱ्या इच्छा पूर्ण झाल्यावर देवीबरोबर तुम्हाला पण ड्रेस घेऊन येतो. पण काय हो सार काई नक्की खरं होईल ना ?

**सदा–** त्याची तुमी अजिबात काळजी करू नका. तुमचं काम झालं म्हणुन समजा. एका महिन्याच्या आत. तुमची बायको तुमच्या घरात तुमच्या शेजला, शेजारी आली म्हणून समजा. आन् मी दहा महिन्याच्या आत तुमच्या हातात पाळण्याची दोरी देतो.

**प्रवासी–** फार उपकार होतील माझ्यावर.

**सदा–** अहो त्यात उपकार कसले ? अहो ज्याना मुलं होतात त्यांच्या गाडीला ब्रेक लावायचा व ज्याना होत नाहीत त्यांच्या गाडीला वेग लावायचा, हा माझा पोटाचा धंदा आहे, तुम्ही अजिबात काळजी करू नका. माझ्यावर विश्वास ठेवा आन् कामाला लागा, एक दिवसबी वाया घालवू नका. प्रयत्न तुमचे अन् आशिर्वाद देवीचे.

**प्रवासी–** मग येतो. (गुऱ्हाळ – गाण नं. १)

आरं माणुसकीचं गुऱ्हाळ आमुचं
एरंडाचा रस गळतो.
आज देव धर्म ते सर्व सोडुनी
पैशा मागं जीव पळतो.
इथे न कोणी राम न येशू
ना राही गौतम अल्ला
ज्याच्या त्याच्या तोंडी दिसतो ॥ १ ॥
बघ स्वार्थाचा रसगुल्ला
म्हणूनच सज्जन अन्नाविन मरतो
संसारानं सत्य सोडलं
रस्त्यावरती फिरती सती

लाज घेई डोळं झाकून
कुमारिका ह्या माता किती
पण, सांग गोरस पान्हा कुठे फुटतो ॥ २ ॥
बेकाराची फुटली पेवे
साथीला ते हेवे दावे
वशिला शिकवी काळे कावे
गरिबानी ना इथं रहावं
हे समजून तुम्हाला मी सांगतो ॥ ३ ॥
काल गुळात होती, गड्या गोडी फार
तीच आज नवटाकाची पहीली धार
आई बाबा गेले ढगात
राज्य कलींचे आज जगात
आरं विचार उद्याचा कोण करतो ॥४॥

सदा– या, (असे म्हणून सदा प्रवाशाला निरोप देतो व ज्या दगडावर डब्यात शिल्लक राहिलेला रंग ओतला आहे. त्याच्याजवळ जावून पुढील वक्तव्य देतो.)

साधा च्या– आयला. दगडा, लेका तू देव झालास. अर्ध्या तासापूर्वी एखाद्या कुत्र्यानं वर पाय करून तुझ्या डोक्यावर गंगा ओतली असेल पण आता एका झटक्यात तुझा भाव एकदम व्हदारला पण लक्षात ठेव मी तुला देव केलाय. जर का माझ्याशी बेईमान करशील तर मी पुन्हा तुला दगड केल्या शिवाय सोडणार नाही. तू माझ्याशी सरळ वागलास तर मी तुला काही कमी पडू देणार नाही. आजपासून तुझं नाव देवी म्हाकूबाई उर्फ मायाअक्का तू काही काळजी करू नकोस. थोड्याच दिवसात मी तुला अखिल भारतीय देवस्थानाची प्रधान बनवितो. आणि मी त्याचा सेक्रेटरी होतो. मी तुला संपूर्ण जगाची आई बनवतो. तू मला माणूस बनव. (असे म्हणून सदा गबाळे दगडापुढे हात जोडून उभा रहातो. तोच त्या दगडातून एक प्रचंड आवाज

ऐकू येतो. व या क्षणार्धात तो दगड दुभंगला जाबून त्यातून एक सुंदर तरूणी नऊवारी साडी मध्ये बाहेर येते. हा सारा प्रकार सदा डोळे फाडून पहात रहातो. काय होतय, काय झालय, आणि काय करावं हे सदाला कळत नाही.) देवी, आई जगदंबे मेलो, मेलो धावा धावा. अरे मी कुठे आहे ? मला धरा... मला धरा. अरे कुठंच काय आन् फाटक्यात पाय दगडाला झाली नऊवारी बाय. ए दगडा मी तुझ्या पाया पडतो ह्या बाईला एवढी पोटात घे. अरे प्रजेला पोर होऊ नयेत म्हणून मो कुंपन घालतोय. अन् ह्या कुंपनानच शेत खायचं म्हटल्यावर माझं कसं होईल. अरे ही तुझी डिलीव्हरी मला घालविल देवाघरी. तेव्हा तुझी बाय आलेल्या वाटनं पोटात घे. काय वाटेल ते घे, वाटेल तर मला घे पण या बाईला परत ने. मी एकदम साधा भोळा माणूस हाय. मला नाही त्या लफड्यात पाडू नकोस.

**तरुणी**– मी बाई नाही. मला सारख बाई-बाई म्हणू नकोस.

**सदा**– मग मी तुला फार तर आई म्हणतो. पण माझ्या आई तू आलेल्या वाटेने परत जा. अग आपल मायबाप सरकार बायाना पोर होऊ नयेत म्हणून सारख धडपडतय आणि हीत तर दगडाला बाया व्हायला लागल्या तर प्रत्येक डोंगरात बायांच्या खाणी लागतील. आन् त्याना नवरे पुरावय-साठी सरकारला एखादा नवऱ्याचा कारखाना काढावा लागेल. पाचव्या योजनेची पंचाईत व्हईल आणि जनता कराखाली बुडून जाईल.

**तरुणी**– मी परत जाणार नाही.

**सदा**– ठीक आहे. मग मीच येथून निघून जातो. (तो निघतो)

**तरुणी**– तू कुठं निघालास ?

**सदा**– पुढचा त्रिकोण रंगवायला.

**तरुणी**– अरे मी तुला प्रसन्न झालेय.

**सदा**– तुमच्या या प्रसन्न होण्यानं माझी अक्कल पार सुन्न झालीय त्याचं काय ? आदी मला खरं सांगा तुम्ही कोण हाय ? लक्ष्मी, सरस्वती, की शक्ती ?

**तरुणी**– मी यातली कुणीच नाही,

**सदा**– मग तुमचं नाव काय ?

तरुणी– तु ठेवशील ते.
सदा– मी कुणाला नाव ठेवीत नाही.
तरूणी– मी तुला आवडले नाही.
सदा– अहोपण माझ्या आवडण्याचा अन् न आवडण्याचा येथे प्रश्नच कुठ येतो. हा मी चाललो.
तरुणी– मला एकटीला सोडून.
सदा– मग मी काय करू ?
तरुणी– मला बरोबर घेऊन चल.
सदा– अन् कुणी इचारलं ही कोण ? तर काय सांगू ?
तरुणी– सांगायचं, आहे कुणीतरी म्हणून.
सदा– आजच्या जगात कुणीतरी हाय म्हणून सागून चालत नाही. सारं अशी डिटेलमंदी सांगावं लागतं. तुमच्याबद्दल काय सांगू ? तुम्ही दगडाला झाला म्हणून ? अन् कुणी तुमच्या बाचं नाव विचारलं तर काय सांगू सह्याद्री की हिमालय ? हे बघा तुम्हीं कुनी बी असा मी तुम्हाला हात जोडून सांगतो मला माझ्या वाटेनं जाऊ द्या.
तरुणी– तुम्हाला बायकांची भीती वाटते ?
सदा– छे...छे... भलतच काय बोलू नका. मी पांव-ऊणा पाहुणा नाही.
तरुणी– म्हणून माझ्यापासुन दूर पळताय.
सदा– हे बघा तुम्ही मला असे कोडचात टांडू नका.
तरुणी– मी तर तुझं कोडं सोडवायला आलेय.
सदा– माझं कोड ? मला कसलं कोड पडलय ?
तरुणी– पैशाच, नवा फड उभा करायचा.
सदा– हे तुम्हाला कोणी सांगितलं ?
तरुणी– कुणी सांगायला कशाला हवंय ? मला सारं काही कळतय.
सदा– म्हणजे तुम्ही देवी हाय.
तरुणी– नाही.
सदा–– मग तुम्हीं हाय तरी कोण ?
तरुणी– ते मी आत्ताच सांगणार नाही.
सदा– मग केव्हा सांगणार ?

**तरुणी**– वेळ येईल तेव्हा.

**सदा**– पण काय हो ? तुम्ही कोणत्या युगातल्या देवता ? द्वापार, सत्य की कली.

**तरुणी**– हे समजावून घेऊन तू काय करणार ?

**सदा**– मागं झालेल्या भानगडीशी तुमचा काही संबंध लागतो का ते बघणार.

**तरुणी**– मागच्या कोणत्या भानगडी ?

**सदा**– तुम्हाला रामायणातला दशरथ राजाचा मुलगा राम माहीत हाय ?

**तरुणी**– त्याचं काय झालं ?

**सदा**– अहो तो वनवासाला जात असताना त्याला ठेच लागली. ज्या दगडाची त्याला ठेच लागली तो दगड फुटला आन् त्यातनं तुमच्यासारखी एक बाय बाहेर आली.

**तरुणी**– ती तर अहिल्या. ~~दुर्वास~~ ऋषींची पत्नी.

**सदा**– तेच सांगतोय मी तुम्हाला. एकदा देवांचा राजा इंद्र स्वर्गातून मृत्यू लोकात आला. त्यानं दुर्वास ऋषीचं खोटं रूप घेतलं अन् बिचाऱ्या साध्वीला बाटवून टाकलं. इंद्र गमजा करुन गेला अन् बिचारीचा दगड झाला. नाही म्हणजे, म्हणायचय् तुमचीबी तशी कुणी गमज्या बिमज्या केली नाहीना ?

**तरुणी**– म्हणायचय् काय तुला ?

**सदा**– तुम्ही तुमच्या वाटेनं जा, मी माझ्या वाटेनं जातो.

**तरुणी**– समज मी तुझ्याबरोबर आले तर तुला काय त्रास होईल.

**सदा**– त्रास माझ्यापेक्षा तुम्हाला जास्त होईल.

**तरुणी**— कसला ?

**सदा**— उपाशी मरायचा.

**तरुणी**– मी तुझी सारी गरीबी दूर करीन.

**सदा**– ती कशी ?

**तरुणी**– तुला हवे तेवढे पैसे देईन.

**सदा**– माफ करा. जवा माझा फड व्हता तवा हे सारे लोक मला मानाचा मुजरा करीत होते. कसं काय शाहीर म्हणून विचारपूस करीत होते. तुला

जे. पी देतो म्हणत होते. अन् माझ्याच पैशाची पीत होते. सारे साले भाडखाऊ. अजून आठवण झाली की काळजात कशी कालवाकालव होते. डोळ्यापुढे पालीच्या खंडोबाची जत्रा येते अन् दिसू लागतो सदा गबाळे व पार्टीचा फड. निढळाच्या घामानं उभा केलेला फड, फिरता तंबू एक मोटार गाडी आणि माणसांनी भरलेल्या हाऊसफुल्ल कवाती मनातल्या मनात तिसरी घंटा होते. नसलेल्या ढुलकीवर हाताची थाप येते आणि सुरू होतो आठवणींचा गण. त्यांच्या मागनं येताच आसवांच्या गवळणी. वगाला सुरूवात व्हायच्या आतच पाण्यानं डोळ भरून जातात अन् पुढचा सारा खेळ त्यात बुडून जातो. काय सांगू तुम्हाला हजार वेळा मनाची समजूत घातली बाबा झालं गेलं विसरून जा. पण ते सालं मानायलाच तयार नाही.

**तरुणी—** पण हे झालं कसं ?

**सदा—** कसं झालं. ही आम्हाला निवडणूक नडली एका पार्टीच्या प्रचाराला आमचा फड फिरला. ज्याचा प्रचार केला तो निवडून आला आन् दुसरा बाराच्या भावात गेला. त्याचं डिपाझिट जप्त झालं. तो पराभवाच्या सूडानं पेटून उठला. त्यानं माझा भरला तंबू पेटवून दिला. आग विझविण्यासाठी जीवाचं रान केलं. पण काहीच उपयोग झाला नाही. क्षणापूर्वीचा लोक-नाट्याचा बादशहा बघता बघता गरीबाचा गुलाम झाला. दाहीदिशानी साथीला आलेली माणसं चारा संपल्यावर उडून जाणाऱ्या रानपाखराप्रमाणं उडून गेली.

**तरुणी—** मग पुन्हा फड उभा करण्याचा प्रयत्न का केला नाही.

**सदा—** तुम्हाला काय वाटलं ? मी गप्प बसलो ? अहो खूप काय केलय. पण झालं काहीच नाही. ज्यानी ज्यानी मला प्रशस्तीपत्रकं दिली होती त्याना जावून भेटलो. पण साऱ्यानीच काखा वर केल्या. अन् मला वाटाण्याच्या अक्षता दिल्या. जवळ होत्या लावण्या, गण अन् गवळणी पण पोटाच्या भूके-पुढे लावण्या, गण अन् गवळणी त्या पण मुक्या झाल्या. भुकेनं मुंबईचा रस्ता दावला. हातानी हमालीची परवानगी दिली आणि शाहीरचं डोकं ओझ्याचं गाढव झालं. एक आठवण सांगतो— एक होता भल्या मनाचा, मोठ्या दिलाचा, एक शाहीर होऊन गेला. या मातीत. ज्याच्या आवाजाला भिऊन ढगानी गडगडायचं थांबवलं. त्याच्या जिभेच्या धारेनं विजेला लाजवलं.

अन् ज्याच्या गाण्यानं 'मुंबईसह महाराष्ट्राचं' प्रतिशिवाजीला भान आणून दिलं त्या शाहीराचं नाव अमरशेख. मी दादर स्टेशनवर हमाली करीत होतो त्याला हमाल पाहिजे होता. मी पुढे गेलो. त्यानं मला ओळखलं अन् म्हणाला तू . तू...हे काम करतोस. अरे राजानं सिंहासनावर बसायचं असतं सिंहान स्वत: केलेली शिकार खायची असते अन् तू...तू... हे करतोस ? चल माझ्याबरोबर. अरे कलावंतानं कलेची सेवा करायची. का लोकांची हमाली ? मला वाटलं आपण पुन्हा आपला फड उभा करू ? मनाचा तुरा पुन्हा फेट्यात खोवू. पण देवाला हे मंजूर नव्हतं. त्यानं माझ्याशी चालबाजी केली आणि त्या देवमाणसाला आपल्या स्वर्गाच्या राज्यात बोलावून घेतलं. मी रस्त्यावरचा रस्त्यावरच राहिलो. ज्याचा प्रचार केला. ते मोठे झाले. त्याना जाऊन भेटलो पण त्यानी मला आश्वासनाशिवाय काही दिलंच नाही. शे-पन्नास हेलपाटे घातले. अहो तुमच्यामुळे मी देशोधडीला लागलो. हे समजावून सांगितलं तेव्हा त्यानी मेहरबानी केली अन् हे त्रिकोण रंगवायचं काम मला दिलं. पण ह्या त्रिकोणानं बी मला धोका दिला. अन् दगडाला तुम्ही झाला. काय हो तुम्हाला जादू-बिदू येते की काय ? अन् ही विद्या कुणी शिकवली ? बाई तुम्ही भूत-बित तर नाही ना ?

**तरुणी**– तू मला पुन्हा बाई म्हणालास ?

**सदा**– मग मी म्हणू तरी काय तुम्हाला. तुम्हाला आई म्हटलं तरी चालेल ना. बाई म्हटलं तरी पटेना मी तुम्हाला म्हण तरी काय ?

**तरुणी**– तू मला कल्पना म्हण,

**सदा**– कल्पना ? ही कुणाची कोण ? हिवर म्हणे मी चिंचचा भाच्या.

**तरुणी**– तू कवि अन् मी तुझी कल्पना. कशी काय वाटली माझी तुला कल्पना ?

**सदा**– कल्पना काही वाईट नाही. पण काय हो तुम्ही माझ्याबरोबर येणार म्हणजे नक्की काय करणार ?

**तरुणी**– तुझ्याबरोबर राहणार, तू जिथं जाशील तिथं येणार.

**सदा**– समजा, कुणी इचारलं ही कोण ? तर मी काय सांगू ? मला म्हणयचय् तुमचं माझं नात कोणतं सांगू ?

**तरुणी**– जे कवीचं कल्पनेशी असते ते.

**सदा**– मला नाही समजलं.

**तरुणी**– तू स्वतःला कवी समजतोस ना ?

**सदा**– समजतो म्हणजे काय समजतोच.

**तरुणी**– तरी तुला कवी आणि कल्पना यांचं नातं सांगता येत नाही ?

**सदा**– नाही.

**तरुणी**– मग तेच तुझं माझं नातं. जे आहे पण ते सांगता येत नाही कुणी विचारलं तर सांगायचं ही माझी मैत्रिण आहे म्हणून. मी तुझी मैत्रिण तू माझा मित्र.

**सदा**– नुसतंच ?

**तरुणी**– नुसतंच काय ?

**सदा**– अहो आजकालच्या नुसत्या मैत्रिणीला काही अर्थच नसतो. रस्त्यानं भाऊ-बहीण चालले तर लोक म्हणत्यात लफडं चाललंय. अहो या लोकांच्या डफड्यात भानगडीशिवाय काय भरलेलंच नसतं. म्हणून म्हणतो. तुम्हाला माझ्याबरोबर बघितल्यावर लोक पण तसंच म्हणतील.

**तरुणी**– मला आवडेल ते.

**सदा**– काय ? लफडं तुम्हाला आवडेल.

**तरुणी**– न आवडायला काय झालं ? बोलणाऱ्या लोकांच्या तोंडाला कोण हात लावणार ? तेव्हा या क्षणापासून तू माझा मित्र आणि मी तुझी मैत्रिण. का असं करूया ?

**सदा**– कसं करूया ?

**तरुणी**– तू माझा नवरा हो. मी तुझी बायको होते. खोट खोट.

**सदा**– खोटं खोटं ? अन् तेबी नवरा बायको ? ते कसं व्हायचं ?

**तरुणी**– हे नातं नुसतं जगाला सांगायसाठी. तेव्हा ठरलं, तर या क्षणापासून तू मला अग म्हणायचं. आणि मी तुला अहो म्हणायचं.

**सदा**– ते न्हाय जमायचं.

**तरुणी**– का नाही जमायचं ?

**सदा**– पण मी म्हणतो, तुमची माझ्यावर एवढी जबरदस्ती का ?

**तरुणी**– कारण तू मला आवडतोस.

सदा– काय हो बाई, मी तुम्हाला आवडतो, म्हणजे नक्की काय हो होतं.

तरुणी– वाटतं तुझ्याबरोबर रहावं. तुझं जीवन पहावं थोडे दिवस तुझी सोबत करावी.

सदा– पण मी कुठं रहातो ते माहीत आहे का तुम्हाला?

तरुणी– कुठं ?

सदा– फुटपायरीला.

तरुणी– मग मी पण राहीन तिथं तुझ्याबरोबर.

सदा– अहो, रस्त्यावर रहायचं म्हणजे दगडातून बाहेर येण्याइतकं सोपं नाही.

तरुणी– तरी पण तू तिथं रहातोसच ना ?

सदा– अहो, अडला नारायण गाढवाचं पाय धरी. माझं द्या सोडून, माझ्या-सारखे लाखो लोक या उघड्या जगात रहातात. त्यांचं सारं काही उघड्यावर चालते. ते उघड्यावर जन्माला येतात अन् उघड्यावरच मरतात येणारे जाणारे मात्र डोळे फाडून ते बघत असतात. अन् ते बिचारे मात्र डोळे झाकून असतात. तेव्हा माझं ऐका, मला माझ्या वाटेन जाऊ द्या

तरुणी– ठीक आहे. तू जा तुझ्या वाटेनं. पण काय रे ? ज्या वाटेनं तू निघाला आहेस ती वाट तुझी आहे ?

सदा– नाही.

तरुणी– हे कळत असूनसुद्धा तू त्या वाटेन चालला आहेस.

सदा– हो.

तरुणी– पण हे किती दिवस चालणार ?

सदा– कदाचित शेवटपर्यंत.

तरुणी– पण मग तू, तुझा फड का उभा करत नाहीस. मी तुला मदत करीन.

सदा– कसली ?

तरुणी– म्हणशील तर पैशाची. किंवा प्रत्यक्ष साथेची.

सदा– म्हणजे तुम्ही नक्की भूत आहात.

तरुणी– तू भूत पाहिलंस कधी ?

सदा– नाही.

**तरुणी**- मग तू मला भूत का म्हणतोस ?

**सदा**- कारण तुम्ही जे काही बोलता ते मला पटत नाही म्हणून. म्हणजे देव आहे पण दिसत नाही. अन् तुम्ही तर माझ्या डोळ्यादेखत दगडातनं बाहेर आलात मग तुम्ही कोण ?

**तरुणी**- मी कुणी असो. या क्षणापासून मी तुझी जीवाभावाची जोडीदार आहे. एवढं लक्षात ठेव.

**सदा**- पण काय हो, तुम्हाला माझ्याबद्दल एवढा पुळका का ?

**तरुणी**- कारण माझंही तुझ्याकडे एक काम आहे.

**सदा**- कसलं ?

**तरुणी**- माझी एक कथा आहे. ती जर तू तुझ्या लोकनाट्याद्वारे लोकांच्या पुढे मांडशील तर मी तुला तुझं गेलेलं सार वैभव परत आणून देईन.

**सदा**- पण हे सार खरं कशावरून ?

**तरुणी**- फार तर मी तुला ॲडव्हास देईन अन् काय रे जर तू माझी कथा लोकनाट्यामध्ये उभी करू शकला नाहीस तर तू काय देणार मला, ?

**सदा**- मी काय देणार तुम्हाला ? फार तर तुम्हीच मला घेऊन टाका अन् कुठल्यातरी दगडात बसवून द्या. म्हणजे पोटासाठी पायपीट करायला नको.

**तरुणी**- एका प्रश्नाचे उत्तर देशील.

**सदा**- एक का ? चांगलं दहा विचार की ? त्याला कुठं पैसे द्यावं लागत्यात.

**तरुणी**- तुला जवळची कोण ? कला की भूक ?

**सदा**- कला. हे काय इचारनं झालं ?

**तरुणी**- मला नाही वाटत.

**सदा**- का नाही वाटत ?

**तरुणी**- कारण मघापासून बघते आहे तुला तुझ्या कलेपेक्षा भूकेचीच चिंता जास्त वाटते आहे. हाडाचा कलावंत जगतो ते कलेसाठी आणि मरतो तेही कलेसाठी

**सदा**- असा तो पण म्हणाला होता

**तरुणी**- तो कोण ?

**सदा**- आमचा शंकर घाणेकर. तो म्हणाला होता अरे कलाकाराने खायच्या त्या म्हणजे प्रेक्षकांनी खूष होऊन दिलेल्या टाळ्या. आणि पहायचे ते म्हणजे

आनंदाचे किंवा दुःखाचे त्यानी अजाणतेपणी दिलेले अश्रू, हीच कलावंताची बिदागी.

**तरुणी**– आता कुठाय तो ?

**सदा**– त्याचं नाटक संपलं. तो अमर सोंगाड्या शाहीर अमरशेख च्या साथीला स्वर्गात गेला.

**तरुणी**– तू केव्हा जाणार आहेस.

**सदा**– कुठं ?

**तरुणी**– स्वर्गात.

**सदा**– म्हणजे ? तुम्ही मला स्वर्गात पाठवणार की काय ?

**तरुणी**– पण, तिथे तुला जागा मिळेल का ?

**सदा**– तुम्ही हा माझा धडधडीत अपमान करताय.

**तरुणी**– मग काय सत्कार करू ?

**सदा**– हे बघा, आपन करारी मानूस हाय. आपल्याला नाही ते ऐकाची सवय नाही.

**तरुणी**– मग काय, लाल त्रिकोण रंगवायची सवय आहे ?

**सदा**-- बाई, तुम्ही जरा जपून बोला हं. सांगून ठेवतो.

**तरुणी**-- नाहीतर काय करशील ?

**सदा**-- तुम्हाला कल्पना नाही कल्पनाबाई, माझ्या रागाचा पारा एकदा का वर चढला की, मग कुनी किती थांब थांब म्हटलं तरी तो खाली उतरत नाही.

**तरुणी** - पण तुझ्या त्या रागाच्या नळीत पारा आहे ना ? मला वाटतय त्यात पाऱ्याऐवजी नुसतं पाणीच भरलेलं असावं.

**सदा**-- तुम्हाला बघायचय माझं पाणी ?

**तरुणी**–नको शिल्लक ठेव. उपयोगी पडेल पुढचा त्रिकोण रंगविण्यासाठी·

सदा-- तुमच्या जागी दुसरी कुणी असती ना तर तिचं तोंडच रंगवून दिलं असतं.

**तरुणी**-- कशानं ? ब्रशान की ओठानं ?

सदा-- या प्रश्नाच उत्तर आज नाही. पुन्हा कवातरी देईन.

(तो जाऊ लागतो)

तरुणी-- कुठं निघालास ?

सदा-- मी कोण आहे ह्याची जगाला ओळख करून द्यायला.

तरुणी-- शाब्बास, शाहिरा शाब्बास, मला हवं ते मिळालं.

सदा-- काय मिळालं हो तुम्हाला ?

तरुणी-- तुझ्यातला जागा झालेला कलाकार. काय रे, नाण्याला बाजू किती?

सदा- एक छाप आन् दुसरा काटा. काय हो ? ह्यो प्रश्न विचारायला तुम्ही मला दुधखुळा पोर समजला ?

तरुणी-- नाही. त्यापेक्षा लहान ?

सदा-म्हणजे.

तरुणी-- तू तुझ्या जीवनाच्या शोकांतिकेची एक चांगली बाजू सांगितलीस, पण त्याचवेळी दुसरी बाजू लपवून ठेवलीस.

सदा--कोणती ?

तरुणी-- जिच्यामुळे तुला हे दिवस आले. खरं ना ?

सदा-पण हे तुम्हाला सांगितलं कुणी ?

तरुणी- म्हणजे मी म्हणते ते खरं आहे. शाहीरा तुला पैशाची धुंदी चढली होती.

सदा-पण, मिळालेला पैसा मी माझ्यासाठी कधीच वापरला नाही.

तरुणी- तेच म्हणायचय मला. आलेली लक्ष्मी तू खिरापतीसारखी वाटत राहिलास. मागणारा कोण आहे, कशासाठी मागतो आहे. त्याचा विचार तू कधी केलाच नाहींस, शेवटी झालं काय ? तुझा कर्ण झाला पैशाची कवच कुंडलं निघून जाताच तुझ्या रथाचं चाक दुर्दैवानं घट्ट पकडून ठेवलं, अजून एक विचारु ?

सदा-विचारा.

तरुणी- दोन वर्षापूर्वी शिखर शिंगणापूरच्या शंभूदेवांच्या यात्रेत लोकांनी तुझा खेळ का बंद पाडला होता ?

सदा-आठवत नाही.

तरुणी-- कसं आठवेल ? कारण तू दारु पिऊन धुंद झाला होतास ? ज्या सरस्वतीने तुझी सदैव साथ केली तिला तू दारुच्या पेल्यात बुडवून टाकलीस

वाटलं होतं तूं मला तुझी खरी ओळख करून देशील. पण तू स्वतःला लपवून ठेवलंस. शाहीरा, एका पैंजेचा विडा उचलशील ?

**सदा**– कोणता ?

**तरुणी**– मी सांगेन त्या कथेचा वग तयार करायचा. कथेची कल्पना माझी वग तुझा. तू जर हा पैंजेचा विडा जिंकलास तर मी तुला सारं काही देईन.

**सदा**– ठरलं. मी तुमच्या पैंजेचा विडा उचलला. आता तुम्ही मला तुमची कल्पना सांगा.

**कल्पना**-- माझ्या कथेची कल्पना मी सांगणार नाही.

**सदा**– मग मी वग कसा बांधणार?

**कल्पना**– तू आणि मी इथून प्रवासाला निघायचं. वाटेत जो कोणी भेटेल तो आपल्या कथेतील पात्र समजून त्याच्या मदतीने वग तयार करायचा. फक्त एकच गोष्ट लक्षात ठेव.

**सदा**– कोणती ?

**कल्पना**– मी कोण कुठून आले. तुझी माझी भेट कशी झाली याची वाच्यता कधी कुणाजवळ करायची नाही, कितीही प्रसंग आला तरी. आणि जर तू कधी मी कोण आहे, कुठून आले हे सांगण्याचा प्रयत्न केलास तर तू कायमचा मुका होशील.

**सदा**– मला तुमची अट मान्य आहे.

**कल्पना**— अजून एक गोष्ट सांगून ठेवते.

**सदा**-- सांगा.

**कल्पना**-- सांगा नाही, सांग. या क्षणापासून तू आणि मी पतिपत्नी. तू माझा कारभारी. मी तुझी अग. या क्षणापासून चारचौघात पती-पत्नि सारखं वागायचंच.

**सदा**-- पती-पत्नी सारखं ? आणि तेबी चारचौघात ?

**कल्पना**-- का आश्चर्य का झालं तुला ?

सदा-- पती-पत्नीसारखं वागायचं म्हणजे. मला म्हणायचंय पाच-दहा वर्षांत लोकनाटयाला लागणारी सारी पात्रं आपल्या घरीच तयार होतील.

कल्पना– मूर्ख आहेस.

सदा– कावो ?

कल्पना– चार चौघात आपण पती-पत्नीसारखं वागायचं. पती-पत्नी म्हणून नव्हे. समाजात पती पत्नी आणि–

सदा– आणि घरात--?

कल्पना-- तू कवि अन् मी कल्पना. चल या क्षणापासून रिहर्सलला सुरूवात.

सदा– कोणत्या ? पती- पत्नीच्या ?

कल्पना– लोकनाटयाच्या, तुला फडाला किती साथीदार लागणार.?

सदा– एक नाचणारी पोर.

कल्पना– ती कशी हवी ?

सदा– बाहेरुन तुमच्यासारखी

कल्पना– म्हणजे ?

सदा– दिसायला हो. अन् नाचायला बिजलीसारखी.

कल्पना– मग ते काम मी करीन.

सदा– कोणत ? दिसायचं की नाचायचं ?

कल्पना– दोन्ही ही.

सदा– म्हणजे तुमाला नाचायला येतं ?

कल्पना– हो। अगदी हवं तसं.

सदा– हवं तसं म्हणजे ?

कल्पना– हवं तसं. कथकली. भांगडा, म्हटलं तर मुंबईच्या मोठ्या हाटेलात चालत ते बिन कपडयाचं नाचगाणं सुद्धा.

सदा– आयला कमाल हाय ! मला वाटलं तुम्ही निसतं दिसायलाच माल हाय. म्हणजे तुमाला गायला पन येतं.

कल्पना– पहाचय तुला ?

सदा– एकदमच सगळ नका दाखवू. मी भांबावून जाईन.

कल्पना– तर मग रिहरसल सुरू करू या. तू गा मी नाचते.

सदा– ठीक आहे.

कल्पना– काय ठीक आहे ?

सदा– तुम्ही नाचा मी गातो.

कल्पना– अरे पण पायात बांधायला घुंगरु कुठायत ? त्याशिवाय मी कशी नाचणार.

सदा– घुंगरूच ना ? मग ती माझ्याजवळ हायीत की ?

(शाहीर काखेतल्या पिशवीतून घुंगरु काढून कल्पनेच्या हातात देतो)

कल्पना– म्हणजे अजून घुंगरु तू जपून ठेवले आहेस तर ?

सदा– अहो डफ, आणि घुंगरु तर आम्हा शाहिरांच दैवत. एका वेळेला शाहीर स्वत:ला विसरेल, पण या शीवशक्तीला कसा विसरेल ?

कल्पना– म्हणजे तुझ्यातला शाहीर अजून जागा आहे ?

सदा– मी नुसता शाहीर नाही ?

कल्पना– मग ?

सदा– लोक मला शाहीरांचा राजा म्हणतात.

कल्पना– मग तो आहे कुठं ?

सदा– दाखवतो ना.

(असे म्हणून सदा पूर्वी लोकनाटयात केलेल्या भूमिकेचे एक प्रात्यक्षिक करून दाखवतो व त्यानंतर कल्पना नृत्याचे विविध रंग रूप सादर

करते. त्यानंतर शाहीर सदा गवाळे गाणं म्हणतो आणि कल्पना त्याला साजेसं नृत्य करते. हे नृत्य सुरू होण्याच्या वेळीच एक ढुलकी पटू व दुसरा हार्मोनियमवाला साथीला हजर होतो. जेव्हा गाणे आणि नृत्य संपतं तेव्हा सदाचे लक्ष त्या दोघांकडे जातं.

## गीत

दुधाळ रुपाचं थंडगार चांदणं
माझ्या जीवाला लई जाळतं
हळूच घुसून मनाच्या घरट्यात
अग नको नको ते सदा बोलते ॥ १ ॥
पळवून आणत स्वप्नांच्या लाटा
घेऊन जाता ओठांच्या काठा
एक करू म्हणतं दोघांच्या वाटा
अंगावर फुलवतं गुलाबी काटा ॥ २ ॥
भुलव्या डोळ्यानी भूल पाडतं
पदरी उराची आडी दावतं
ओठा ओठांची दारं लावतं
खुळ्या जीवाची वाट लावतं ॥ ३ ॥
मी ग शंभर नंबरी साधा भोळा
मीठीत करतेस चोळा मोळा
गुदगुल्यानी जीव झाला गोळा
कसा लागावा आमचा डोळा ॥ ४ ॥
चांदण्यात एकदा ऊन पडू दे
माझ्यावर थोडा जीव जडू दे
स्वप्नातलं सारं ते खरं घडू दे
जोडीनं देवाचं पाय धरू दे ॥ ५ ॥

**सदा**– कोन सगन तू ? अन् छगन्या तू पण ?

**छगन**– व्हय सदाभाऊ !

**सदा**– कसं आहात तुम्ही दोघं ?

**छगन**– जसं असायला नको हाय तसं

**सदा**-- सध्या काय करतोस ?

**छगन**-- रामदास स्वामींचा उद्धार करतोयच.

**सदा**– म्हणजे काय करतोस तरी काय ?

**छगन**– काय सांगू सदाभाऊ आपला फड बंद पडल्यापासनं चारदोन फडात नोकरी केली पन कुठच माजं जमलं नाही.

**सदा**– का ?

**छगन**– आपल्या फडात कलाकाराची जी इज्जत होती. ती मला कुठंच मिळाली नाही. पैसा, खायला प्यायला मोप होतं. पण पाळलेल्या कुत्र्यागत. सदान् कदा गोंडा घोळायचा. म्हणून इचार केला अन् सज्जनगडावर गेलो.

**सदा**-- कशाला ?

**छगन**– लायसन काढायला.

**सदा**-- कसलं ?

**छगन**-- स्वामीचं मनाचं श्लोक म्हणायच. समाधीपुढं जावूनशान, हात जोडून उभा राहिलो. रामदास स्वामीना सांगितलं उद्यापासून गांवोगाव तुमचे श्लोक म्हणत फिरणार आणि तुम्ही जनता जनार्दनाच्या मनात शिरून जे काही द्याल, ते खाणार आणि गेली दीड वर्षे तेच करत आहे.

**सदा**– सगन तुझं कसं चाललंय ?

**सगन**-- चाललय कसं तरी.

**छगन**– कसं तरी चाललंय म्हणून काय सांगतोस ? चांगल चाललंल म्हणून सांगना. सदाभाऊ मी सांगतो. ह्याचं कसं काय चाललंय ते.

**सगन**-- सदाभाऊ तुम्ही ह्याच काही एक ऐकू नका.

**छगन**– ऐकू नका. पण समजून घ्या बरं का सदाभाऊ आपला खेळ बंद झाल्यावर हा घरी गेला. ह्याच्या म्हातारीन ह्याच लगीन करून दिलं. लगीन झाल्या झाल्या ह्यानं आपला स्वतःचा खेळ सुरु केला. एका रात्रीत तीन तीन शो.

**सगन**– उगाच काहीतरी बरळू नकोस.

**छगन**– मनाचे श्लोक म्हणायला लागल्यापासून मी घेत नाही, हे तुला माहीत आहे ना ? सदाभाऊ चार वर्षांत याला चार पोरं झाली. आपल्या भारतातला हा खरा पतीउद्योग आहे

**सगन**– अरे पण त्यातलं एक जुळं आहे.

**छगन**– हो. ते सांगायचं राहिलंच. बरं का सदाभाऊ ह्याच्या या चार पोरात एक जुळा जोड आहे. हा ह्याचा खास जनना शो. आणिबाणीच्या काळात सरकारची इच्छा नसताना रक्ताचं पाणी करून सादर केलेला.

**सदा**– बरं ते जाऊ दे ह्याची तुझी गाठ कशी पडली ?

**छगन**– सांगतो ना श्लोक म्हणत म्हणत एकदा मी एका गावात भिक्षेला गेलो एका अंगणात जावून आम्ही आरोळी ठोकली-आधी प्रपंच करावा नेटका

**छगन**– तोच घरातून एका बाई माणसाचा आवाज माझ्या कानावर येऊन आदळला तुम्हाला काही येळकाळ कळते की नाही ? घरात अवती भवती पोर खेळत असतांना तुम्ही लाडात येताय, तुम्हाला म्हणावं तरी काय ? रात्री काय कुठं कामाला जायाचंय ? हे शब्द कानी येताच मी सरळ श्लोकाला सुरवात केली. आधी प्रपंच करावा नेटका। मग पहावे परमार्थ विवेका।। हा माझा श्लोक ऐकून ती घरातली बाई म्हणाली उठा ! बाहेर जावून त्या गोसाव्याला भिक्षा व ढा. तेव्हा मला भिक्षा वाढायला कोण आलं माहित आहे.

**सदा**– कोण

**छगन**– ह्यो तुमचा सगन्या, कचकड्याच्या खेळण्यांना जीवंत खेळणी पुरवणारा. पोरांच्या कारखान्याचा मालक

सगन– तुझ्या जिभेला हाड बिड आहे का नाही.

छगन– हे बघ मानसाच्या दोन अवयवाला हाडं नसत्यात. अन् तीच लई कामाची असत्यात त्यातला एक अवयव म्हणजे जीभ बरं का सदाभाऊ ह्याची भेट झाल्यावर मी ह्याला म्हणालो तू घरी बसून जे काही करतोयस ते आता जरा थांबव तुझ्या कारखान्याला टाळबंदी कर. आणि माझ्या-बरोबर चल. तेव्हापासून ह्यो पण बघत बघत मणि पुढं माझ्या साथीला आला. सध्या मी गातो अन् ह्यो वाजवतो.

सगन– तू गातोस आणि मी वाजवतो.

छगन-- अरे म्हणजे मी श्लोक म्हणतो आणि तू साथीला ढुलची वाजवतोस.

सगन– पण ढुलची हा शब्द तू म्हणणार केव्हा ? का आपलं नुसतं वाजवतोच ?

छगन–अरे पण ह्या कोण ? सदाभाऊ तुम्ही याची ओळख नाही करून दिली.

सदा– हा आमचा नवा कारखाना.

छगन– मग काय ओपनिंग बिपनिंग झालं की न्हाय ?

सदा– अजून नाही. आणि ते करायच्या येळेला माझं मीच करणार हाय. कुनी पावना बिवना बोलवणार नाही.

छगन– बर मग पुढं काय ?

सदा– कशाचं ?

छगन– पुढच्या पोटाचं ?

सदा– सांगितलं ना अजून कशात काही नाही. तर पोट कसं पुढं येईल. ?

छगन– अवं मी पुढं येणाऱ्या पोटाचं न्हाय बोलत. पुढच्या पोटाचं म्हणजे– उद्याच्या पोटापाण्याचं विचारतोय.

सदा– अस्स होय. मग असू दे.

सगन– सदाभाऊ तुम्ही यांची ओळख करून द्या की.

सदा– ह्यांची–म्हणजे हीचं नाव कल्पनाबाई कोल्हापूरकर. कालच ह्याना कोल्हापूरहून घेऊन आलो. पुन्हा फड उभा करायचा माझा विचार आहे. तुम्ही दोघे जर आमच्या बरोबर आलात तर दुधात साखर पडेल.

**छगन**– अवो, हे काय बोलनं का बोलन्याचं पिल्लू. आम्ही तुम्हाशिवाय कुठं जाणार ? चल सगन स्वामींच्या मनाच्या श्लोकांना सज्जनगडावर परत पाठवूनं देऊ या. आणि सदाभाऊच्या लावणीत तुम्हा एकदा रंगून जावू या.

**सदा**– तुम्ही भेटलात आणि माझं घरपण परत आल्याचं समाधान झालं. चला दोस्तानो. आजपासनं पुन्हा एकदा रंगदेवतेच्या अंगणात मनमुराद नाचूया. बागडूया. आणि वाटेत जे गाव आज मिळेल तिथं आपण आपला सदा गबाळे आणि पार्टीचा पहिला प्रयोग सादर करूया.

**सगन**– सदाभाऊ त्याच्यासाठी आधी थोडीशी रिअर्सल करायला हवी.

**छगन**– आयला येडचापच आहेस तू एक.

**सगन**– का रे ?

**छगन**– नाहीतर काय ? म्हणे दहा पोराच्या आईला अकराव्या खेपेची भिती घालायची. अर एकदाक पाऊलवाटेचा राजमार्ग झाला की कोनता बी नवा प्रवासी डोळं झाकून प्रवास करू शकतो.

**सगन**– म्हणजे प्रयोगाच्या आधी तालीम नको ?

**छगन**– काय जरूर हाय ?

**सगन**– जरूर नाही कशी ? कल्पनाबाई आपल्या फडात नव्या आहेत. तवा त्यांच्या आपल्या एक दोन तरी तालमी झाल्या पाहिजेत.

**छगन**– अरे त्यांच्या गळ्यात कोकिळा हाय, पायात बिजली हाय, आन् रूपात रंभा हाय.

**सगन**– म्हणनच म्हणतो, त्यांच्या कोकिळे बरोबर आपला साथींचा कावळा कसा काय काव काव करतोय ते बघूया. कसं सदाभाऊ ?

**सदा**– तू म्हणतोस ते ठीक आहे.

**कल्पना**— मग शुभस्य शीघ्रम.

**सदा**– चालेल, आपण इथच एक तालीम घेऊया. आणि रात्री येईल त्या गावात आपला प्रोग्राम ठोकू या. पहिला खेळ देवाला फुकट अर्पन करायचा. चल छगन पात्राची वाटणी कर. सुरुवात गौळणीपासनं झाली पाहिजे.

**छगन**– ठीक आहे. सदाभाऊ तुम्ही व्हा पेंद्या. मी होतो मावशी. सगन्या तू हो कृष्ण आणि कल्पाबाई राधा. हे ओघाओघानचं आलं.

**सगन**-- सदाभाऊ,गौळणीला सुरुपात करायच्या अगोदर कल्पनाबाईस्नी तुमच्या डफाची थाप ऐकवा. कल्पनाबाई आमच्या शाहिरान डफावर थाप टाकलीना म्हणजे ओठाच्या वाटेवरनं शब्दांच्या गौळणी मथुरेच्या बाजाराला निघत्यात. त्याच्या पायातलं पैंजण डफाच्या पाठीवर बोटातल्या बोलात छूमछूम नाचत्यात प्रेक्षकांच्या डोळ्यापुढं धावू लागतो यमुनेच्या तीरावरचा गोकुळचा चोर. (सदा आपल्या काखेतल्या पिशवीतून मधोमध तडा गेलेला डफ काढतो. त्या डफाकडे बघताच शाहिराच्या डोळ्यात पाणी उभे रहाते) काय झालं हो शाहीर ? काय हो ? तुमच्या गोकुळच्या चोराला कुनी चोरून नेला की काय ? आन ह्या तुमच्या आसवांच्या गवळणी कृष्ण-कन्हैयाला शोधण्यासाठी गालाच्या माळावरनं कुठं धावत चालल्यात्या. (तो शाहीराच्या हातातला फुटका डफ पहातो.) अरं ? ही शाहीराच्या शाहीरोची पाठराखीण मुकी कवा झाली ?

**सदा**– झाली नाही ? केली ?

**छगन**– कुणी ?

**सदा**– मीच। साली सारखा पाठलाग करायची. कंसासारखा माझा. म्हणायची मला गौळणी दे लावण्या ऐकव, गण गा. हजार येळा सांगितलं माझ्यातल्या शाहीराला कायमची काळझोप लागली हाय. त्याला जागा करायचा प्रयत्न करु नकोस पन ही ऐकायलाच तयार न्हाय. शेवटी नाईलाज झाला तवा एक कानाखाली चढवली. अनं जन्माची मुकी केली. खरं म्हणशील तर माजा राग हुता त्या बँकेच्या साहेबावर पन त्यो मी काढला या डफावर.

**छगन**–काय हो ह्यो उपटसुंब कोन ?

**सदा**– मायबाप सरकारचा वारस. गोरगरीबांच्या उद्योग धंद्याला भांडवल पुरवणारा सरकारी सावकार. बँकांचं राष्ट्रीयकरण झालं तवा सरकार म्हनल आता गरीबान गरीब न्हायचं नाय. छोटे मोठे धंदे सुरु करायचे. उत्पन्न वाढवायचं.

सदा– एक होता असातसाच. आला एक दिवस भेटायला. सदा, आरं कपाळाला हात काय लावून बसलायस ? उठ स्वताच्या पायावर उभा ऱ्हा. आरं आपली जनता बँक साऱ्यास्नी कर्ज देनार हाय तू बी जावून भेट बँकेच्या सायबाला. त्याच्या बोलन्यानं मला धीर आला. पायात अवसान उभं राहिलं खचलेली कंबर आशेच्या शेल्यानं पुन्हा एकदा करकचून आवळली. आनं जावून भेटलो बँकेच्या सायबाला. हातापाया पडून समद काही त्याला समजावन सांगितलं ते म्हणाले, 'शाहीर बँक तुमच्या कर्जाचा विचार करील पण त्यासाठी तुम्हाला दोन जामिनदार आणावे लागतील, ते घेऊन या मग बघू बँकेची पायरी उतरली आन ओळखीचं सार दरवाजं ठोठावलं. पन जो तो म्हनाला तेवढं सोडन बोल. फार तर एकदा जेवण करून जा. पन जमिनाचा भोंड घालू नकोस, ज्याचं दात माज्या घरचं अन्न खाऊन किटलं, त्यान च मला खडा लागलेल्या घाभागत बाहेरची वाट दाविली. निराश होऊन घरी आलो तवा खुंटीवर अडकवलेली फडातली सारी हत्यारं माझ्याकडं बघून हसायला लागली. आन् म्हणाली 'काय शाहीर ? मिळाला का जामिन ? काखत कळसा आन गावाला वळसा कशाला घालताय ? आमाला घिऊन चला की बँकेत आमी जामीन राहू तुमाला. बँकेच्या सायबाला समजावून सांगू आमी शाहीराच्या कर्जाला जामीन आहोत म्हनून. मी त्याचं ऐकलं, आन समद्याना गोळा करून बँकेत घेऊन गेलो. त्य सायबाला सागितलं सायेब, मी जामिनदार घिऊन आलोय मला कर्ज द्या. मी सायबाला माझं जामिनदार दाखवलं. तवा सायेब म्हनाला ह्यो डोंबाऱ्याचा खेळ रस्त्यावर कर. ही बँक हाय फूटपायरी नव्हं. बँकेला जामीन हवी असतात चालती-बोलती पैशाची लायकी असलेला माणसं हे तुणतुणं आन पेटी नव्हं मी साहेबाला म्हणालो साहेब ही मुकी हायती. ही दिसायला मुकी असली तरी त्यास्नी कलाकाराच्या स्पर्शानं बोलायला येत. ही एकदा का बोलू लागली की दगड-धोंड नाचू लागत्यात. आन झाडंझुडपं याच्यासंग ताल धरत्यात. मी तुमच्या पाया पडतो. मला नाही म्हनू नका, मला कर्ज द्या. ह्या मुक्या जीवास्नी मी बोलायला लावतो. पण माझं म्हननं त्या साहेबाच्या डोस्क्यात घुसलंच न्हाय. त्यो एकदम भडकला आन दारावरच्या शिपायाला म्हणाला– ह्या मानसाला धक्के

मारून हाकलून दे. त्यानं आपल्या साहेबाचा हुकूम तंतोतंत पाळला. आन मला धक्के मारून बाहेर काढला. माजी सारी हत्यारं रस्त्यावर भिरकावली. पेटी फुटली. तुणतुण तुटलं शिल्लक राहिला होता एवढा डफ मी त्याला म्हनालो, तू तरी कशाला शिल्लक रहातोस माग ? तू पन जा. त्यांच्या माग. त्याला पन एक लाफा चढवला. आन कायमचा खाली उतरला. त्या दिवसापासन साला कसा गप्प पडून हाय. मेलेल्या मुडद्यागत. तू डफाचं नाव काढलंस. आन काळजातली जुन जखम डोळ्यातनं वहायला लागली.

**छगन–** शाहीर आता गंगा यमुना नकोत. हव्या आहेत मथुरेच्या बाजाराला जाणाऱ्या गवळणी चला, बाजाराला जायची तयारी करा. आन पेंद्याच्या नात्यानं मावशीचा पदर धरा.

(शाहीर स्वतःला सावरतात व तालीम सुरू होते.)

**पेंद्या–** रस्ता बंद आहे.

**मावशी–** तू र कोन ?

**पेंद्या–** माझ्या आईबापाच्या शेवटच्या प्रयत्नाला आलेलं शेंडफळ. तुम्ही कोण ?

**मावशी–** तुला दिसत नाही का ?

**पेंद्य –** दाखवल्याशिवाय काय दिसल.

**मावशी–** नाही म्हटलं तुला बघायचय काय ?

**पेंद्या–** काय तुम्ही दाखवाल ते ?

**मावशी–** मग माझं हे पायतान बघतोस का ?

**पेंद्या–** तुम्ही माझा धडधडीत अपमान करताय.

**मावशी–** अरं, ये मानाच्या लाडक्या ? तू कुठनं आलास ?

**पेंद्या–** लुगडयातनं.

**मावशी–** लुगडयातनं ?

**पेंद्या–** अग म्हणजे माझ्या आईच्या पोटातनं. तू कुठनं आलीस ? तुझ्या प्रवासाचा मार्ग वेगळा बिगळा होता की काय ?

**मावशी**– आता दीन तोंडात—

**पेंद्या**– वाटेल ते कर पन् माझ्या तोंडात दिवू नकोस.

**मावशी**– कारं ?

**पेंद्या**– मला प्यायची संवय न्हाय.

**मावशी**– का ?

**पेंद्या**– त्याचं काय झालं. माझ्या येळला आईला दूध नव्हतं.

**मावशी**– अस्सं होय ?

**पेंद्या**– न्हाय। झालं काय आमच्या बाबाला बारशाची लई हाऊस. प्रत्येक. वर्षाला पाळणा हालवायचा त्यामुळं माझ्या आदिच्या भावंडानी माझ्या वाटणीच सारं दुध पिऊन टाकलं त्यामुळं मला प्यायची संवय राहंली नाही. म्हणून म्हणतो तू माझ्या तोंडात देऊ नकोस.

**मावशी**– आर, तुझ्या किरडीचा बांबू मोडला मेल्या तुझ्या तोंडात दीन म्हणाले ते माझं पायतान दुसरं काय न्हव.

**पेंद्या**– मावशे तोंड सांभाळून बोल. तुला माझ्या परवानगीशिवाय म्होरं जाता येणार नाही.

**मावशी**– चल ग पोरी. ह्या मेल्या सांडग्याला कोण भीतं. कालचा कोल्हा आन् उसाला गेला.

(मावशी व राधा पुढे जाण्याचा प्रयत्न करतात तेव्हा पेंद्या त्यांना अडवण्याचा प्रयत्न करतो. पेंद्याच्या हातात मावशीचा पदर येतो.)

**मावशी**– ए मेल्या सोड माझं लुगडं.

**पेंद्या**– का ग म्हातारडे ? तुला काय मनाची न्हाय जनाची लाजबीज हाय का न्हाय ?

**मावशी**– का रं ? एवढ्या का मिरच्या झोंबल्या तुझ्या नाकाला ?

**पेंद्या**– काय म्हणजे काय ? मी तुझ्या पोरासारखा आन् तू मला सरळ तुझं लुगडं सोडायला सांगतेस ? मगाशी म्हनाली तुला पदराखाली घीन. तुझ्या तोंडात दीन. आन आता लगेच म्हनते कशी तर लुगडं सोड. अशानं तरुण पिढी बिघडली तर दोष कुणाचा ? त्या तरुण पिढीचा की लुगड्याचा ?

**मावशी**– तुला उटला पटकीचा गोळा.

**पेंद्या**– हे तुझं बोलणं सभ्यपणाला धरून नाही.

**मावशी**– आन माझ्या पदराला हात घालतोस ते मात्र सभ्यपणाला धरून हाय वाटतं ?

**पेंद्या**– मी नुसता तुझा पदर धरला. तुझ्या पदरात हातबित घातला न्हाय. सांगून ठेवतो थांब आमच्या साहेबाला येऊ दे. मग तुला सांगतो.

**मावशी**– त्या कावळ्याचं नाव काय ?

**पेंद्या**– काय म्हनालीस ?

**मावशी**– नाही म्हटलं तुझ्या साहेबाचं नाव काय ?

**पेंद्या**– सोळा सहस्र भोगिल्या नारी तरी बाळ ब्रह्मचारी हे आमच्या सायबाचे नाव.

**मावशी**– तुझा साहेब तुझ्या इतकाच सरळ दिसतोय.

**पेंद्या**– आगं आमच्या साहेबाचं काय बघितलंयस तू ? मी जरी अष्टवक्र असलो तरी आमचा साहेब गोकुळचा बादशहा आहे,

**मावशी**– अर पन त्याला काही नाव बिव आहे की नाही ?

**पेंद्या**– आहे ना ?

**मावशी**– मग ते सांगायला काय घेशील ?

**पेंद्या**– देणार असशील तर ही पोरगी दे.

**मावशी**– पहिल्यांदा तुझ्या साहेबाचं नांव सांग. मग तुला काय द्यायचं ते मी देते.

**पेंद्या**– आमच्या साहेबाचं नाव, गोवरधन धारी, द्वारकानाथ, मथुरावाले ऊर्फ कृष्णकन्हैया आणि मी अष्टवक्र पेंद्या.

**मावशी**– काय रे ? तुझ्या त्या मथुरादास द्वारकावाल्याला गोरगरीबांच्या पोरीबाळींना अडवण्याशिवाय दुसरा काही कामधंदा आहे की नाही. ?

**पेंद्या**– त्याचं काय झालं, लहानपनापासून त्यानी हाच धंदा केला. त्यामुळे त्याचा ह्याच धंद्यावर जास्त हात बसला.

**मावशी–** कुठाय तो तुझा साहेब, बोलाव त्याला, म्हणजे मी पन त्याला माझा हात दावते. आन् थोबाड फोडून वाटेला लावते.

**पेंद्या–** म्हातारे म्हातारे—

**मावशी–** ए मेल्या, तू मला सारखा म्हातारे म्हातारे म्हणू नकोस,

**पेंद्या–** का ?

**मावशी–** मी काय दिसायला इतकी म्हातारी हाय काय ?

**पेंद्या–** झॅक. पिकल्या पानाचा हिरवा देठ आन् येरं पावन्या सरळ भेट. जरा थांब, मी माझ्या शामसुंदराला बोलावून घेतो. आन तुला त्याच्या मुरलीचा पराक्रम दावतो. कन्हय्या कन्हय्या धाव धाव, या बायका माझा विनयभंग करीत आहेत.

**मावशी–** नियमभंग काय ? तुझा मुखभंग केल्याशिवाय तुझं थोबाड बंद होणार नाही. (मावशी पेंद्याला मारायला जाते. तेव्हा कृष्णा त्याच्या मदतीला धावतो.

**पेंद्या–** पाहिलंस कृष्णा ही बाई सरळ सरळ माझ्या गालाला हात लावते.

**कृष्णा–** काय हो बाई ? हे तुमचं वागणं तुमच्या वयाला शोभतंय का ?

**मावशी–** काय शोभतय आन् काय शोभत नाही ते मग सांगते. पहिल्यांदा त्याला जरा माझ्याजवळ पाठव, म्हणजे त्याचा गालाच्या पापडावर हा माझ्या पाच नख्याचा पंजाब उठवते अन् त्याच सारं पानी ह्याच्या पाटलोनीत भरते.

**कृष्णा–** बाई आपला काहीतरी गैरसमज झालेला दिसतोय आमच्या राज्याचा असा नियम आहे की, या राज्यातले दही, दूध, लोणी टॅक्स आकारल्याशिवाय दुसऱ्या राज्यात जावू द्यायचं नाही आम्ही तसा कायदा करून राज्यबंदी केलेली आहे.

**मावशी–** माल आमचा आन् टॅक्स तुमचा ? हा बरा न्याय आहे ?

**कृष्णा–** त्याचं काय आहे तुमचा माल आम्ही नीट तपासून पाहिला म्हणजे निर्यात झालेल्या मालापैकी कोणता माल कच्चा आहे. कोणता माल पक्का आहे हे समजू शकत आणि त्याप्रमाणे ड्युटी बसवून तुमच्या मालावर आम्हाला शिक्का मारता येतो. तेव्हा तुम्ही तुमच्या बरोबर जो माल

वकीला घेतला आहे तो माझ्या सेक्रेटरीला दाखविण्याची तसदी घ्या. पेंद्या नीट मला चेक कर.

**पेंद्या–** चला, आपआपला माल उघडा करा. काय ग म्हातारे तू काय आणलस ?

**मावशी–** दूध.

**पेंद्या–** कुणाचं ?

**मावशी–** कुणाचं म्हणजे ? माझंच

**पेंद्या–** तरीच.

**मावशी–** तरीच काय ?

**पेंद्या–** दुधात भेसळ होते आहे असं जे लोक ओरडत आहेत ते काही खोटं नाही. काय हो मावशीबाई तुमचं माहेर जाफराबादकडचं काहो ?

**मावशी--** कारं ?

**पेंद्या–** काय नाही, तुमचं दूध जास्त दिसतंय म्हणून इचारलं ?

**मावशी–** आरं तुझ्या तोंडात किडं पडलं, मेल्या माझं दूध म्हणजे माझ्या म्हशीचं.

**पेंद्या–** मग हे आधी सांगायला काय होत होतं ? आता तू मागं सर, चल ग पोरी ये माझ्या म्होरं. मुली नांव काय म्हणालीस ?

**राधा–** राधा ..

**पेंद्या--** तू काय माल आणलायस ?

**राधा -** लोणी.

**पेंद्या--** मित्रा, कन्हैया ह्यांच्या लोण्याचे गोळे तूच तपासून घे. तुला माझ्यापेक्षा जास्त अनुभव आहे.

**मावशी–** काय रं ? तू मानसाच्या पोटचा की जनावराच्या ? जवा बगाव तवा ह्याच्या तोंडातन शेनाचं गोळच बाहेर येत्याती.

**कृष्ण–** हे बघा बाई उगाच भांडण नको. तुम्ही आमचं टॅक्स द्या. आणि बाजाराला निघून जा.

**मावशी–** किती पैसे द्यायचे तुम्हाला ?

**कृष्ण–** सध्या आणीबाणी असल्यामुळे आम्ही रोख पैसे स्वीकारीत नाही.

**मावशी–** मग काय द्यायचं तुम्हाला ?

**कृष्ण–** तुमच्या या जोडीदारणीनं एक सुंदर गाणं जरी आम्हाला म्हणून दाखवलं तरी सुद्धा आम्ही खूष होऊ. आम्ही भावाचे भुकेलेले धनाचे नव्हे

**मावशी–** ए पोरी, अग मग तर फारच सोप्यात हाय। काय हो मला एक पाळणा येतो तो म्हणू का ? का अंगाईगीत म्हणू ?

**पेंद्या–** पाळणा माझ्या पोराच्या बारशाला म्हण. आन् अंगाईगीत रात्री झोपताना तुझ्या म्हाताऱ्याला म्हण. आता या राधेलाच एकादं सुंदर गीत म्हणावं लागेल. काय मुरारी ?

**कृष्ण–** हो त्याशिवाय तुम्हाला पुढे जाता येणार नाही.

**मावशी–** बरं बाई, पोरी म्हण एखादं गाणं

(राधा गाण्याला सुरुवात करते. गाणं झाल्यावर त्याना बाजाराला जाण्याची परवानगी मिळते. व तालीम बंद होते.)

## गीत (गवळण)

नको मुकुंदा आम्हा बनवू तू
खेळांतील खेळणी.
नंदगावच्या सासूरवासी आम्हीं
घरंदाज गौळणी
घरी आमुच्या सासू–सासरे
मनात आमुच्या धनी
नको करु रे खटयाळ चाळे
अवचित पाहिल कुणी
भर रस्त्या मध्ये तुझी सदा का ?
प्रेमाची मागणी
अशी कुणाला कधी न मिळते रे
इष्काची खंडणी

जाऊन सांगू यशोदा माते
का ? घालू रे नंदाच्या कानी
शहाणा हो तू अजून मुकुंदा
ना तर येईल रे आणीबाणी

**सदा–** अरे वा ! वा, वा, छान, छान, फारच सुंदर.

**छगन–** पन सदाभाऊ आता एक सांगा आपल्या चौघात सर्वात वरचढ कोण ?

**सदा–** ते, तू, सगन अन् कल्पना ह्याच्यातून शोधायला हवं.

**सगन–** पन मी म्हणतो, हातच्या काकनाला आरसा कशाला ?

**सदा–** मग तू सांग.

**सगन–** कल्पनाबाई, कल्पनाबाईचा नंबर पहिला.

**छगन–** आन् दुसरा माजा. तिसरा आन् चौथा नंबर भांडण न करता तुम्ही दोघात वाटून घ्या.

**कपल्ना–** छगन भाऊलजी.

**छगन–** काय म्हनला, भाऊजी ? कल्पनावाई तुमी काय म्हनला मला ? न्हाय ऐकू आलं पण पुना एकदा म्हना म्हनजे जरा अजून वाईच बरं वाटेल.

**कल्पना–** छगन भाऊजी.

**छगन–** कल्पनाबाई, तुम्ही मला भाऊजी म्हणून हाक मारलीत आन माझ्या कानाचं पारणं फिटलं. बग सगन्या, गाढवाच्या लेका, मी सभ्य झालो. कल्पनाबाईनी मला मानूस म्हणून जगायचं सर्टिफीकेट दिलं. सदाभाऊ माझ्या डोक्यात एक आयडिया आलीया.

**सदा–** कोणती ?

**छगन–** ह्या तुमच्या सदाभाऊचा करुया रामभाऊ, कल्पनाबाईची करुया सीतावैनी. आन मी होतो लक्ष्मण.

**सगन–** आन माझं काय ?

छगन– तुझं काय ? तू अजून लहान आहेस.

सगन– तुला काका म्हननारी चार पोरं माझ्या घरात आहेत.

छगन– मुलांचा आन मोठेपनाचा काय संबंध ? अरे पुरुष म्हणजे ढग आन् बाई म्हनजे वीज, तीनं एकदा का चमकून ढगात उष्णता निर्माण केली, धो-धो पोरांचा पाऊस पडला म्हणून समज.

सगन– ठीक हाय. मग तुम्ही तुमच्या वाटनं जा, मी माझ्या घरी जातो.

छगन– आन घरी जावून करतो काय ? सासऱ्याच्या पोरीची वाट लावतो हेच ना ? आर रूसतोस काय, बीन बटनाची चड्डी घालनाऱ्या पोरासारखा तुझं रुसनं फुगन तुझ्या पोरास्नी दे. त्यास्नी शोभून दिसल.

सगन– तुम्ही प्रत्येकानी आपल्या आपल्या शेलक्या वाटण्या उचलल्या आन मला मात्र तसच ठेवलं.

छगन– ठीक आहे. सदाभाऊ ह्याला आपन पवनपुत्र हनुमान करुया. काय रे ? चालेल ना ? तू म्हण, बजरंगबली की जय. अन मार लंकेची उडी.

सगन– मारीन मारीन. तुला काय वाटतं ?

छगन– शाब्बास, यापुढे दादा वहिनीची सेवा करायची आणि शिल्लक राहिलेल्या वेळात माजी मर्जी सांभाळायची. समजले ?

सगन– नाही नाही ही कल्पनाच मला पटत नाही.

छगन– कोणती हनुमान होण्याची ?

सगन– हो.

छगन– काय ते कारण सांगू ? तुझ्या मानात तुझ्या बायकोचा इचार आला की नाही ? बोल ? अरं हे सगळं नाटक आहे. अरे मर्दा घरी जाईपर्यंत तू कुमार ब्रह्मचारी आणि घरी गेलास की श्रीयुत प्रजापती प्रलयंकारी.

सगन– सोड यार, प्रत्येक गोष्टीत विनोद कसला करतोस ?

सदा, कल्पना– काय म्हणायचंय काय ?

सगन– अरं वादळात सापडलेली आपली नाव आताशा कुट कशीबशी किनाऱ्याला येऊन लागली

सदा– सगन्या तुला काय म्हणायचंय ते सरळ सरळ सांग बघू.

**सगन**– सदाभाऊ, मला म्हणायचंय–तुम्ही राम झाला, कल्पनाबाई सीता झाल्या, ह्यो लक्ष्मण झाला, मी हनुमान झालो. पण ह्या कल्पनेच्या सुखी वनवासाला गालबोट लावणारा एकादा रावण वाटेत भेटला तर ?

**सदा**– सगन, सगन काय म्हणतोस काय ?

**सगन**– म्हणतात ना–मन चिंती ते वैरी न चिंती.

**छगन**– म्हननाराला काय म्हणायचं ते म्हणू दे. ज्याला कुणाला भेटायचाय त्याला छप्पन दा भेटू दे. रावण भेटू दे नाहीतर रावणाचा बाप भेटू दे. त्या दोघाना माझ्याकडे पाठव. साल्याना एका वर्षात दोन दोर पार करून परत पाठवतो. त्यावेळेला तू नुसतं एक काम करायचं.

**सगन**– कोणतं ?

**छगन**– रावणाची कंबर धरायचं.

**सदा**– साला तू नुसता कल्पनेला भितो. आन् उद्याचं मरण आज मागून घेता. चला बिगी बिगी दिवस मावळायच्या आत मुक्कामाचं गाव गांठायला हवं.

**छगन**– सगन्या साऱ्या शंका कुशंका पुढं चालताना मागच्या मागं सोडून दे. थोडीसुद्धा लघुशंका मनात आणू नकोस.

(सगळे वाट चालू लागतात. काही अंतर चालल्यावर त्यांना सौदापूरची सोमा लागते. तिथे त्यांना गबरु कोतवाल अडवतो.)

**गबरु**– काय हो कोण तुम्ही ?

**सदा**– आमी तुमचे पावनं राम राम.

**गबरु**–पन गांव, नाव, पत्ता ?

**छगन**– आम्ही वनवासी आहोत. सुख कुठं मिळतंय का ते शोधायला चाललोय आपण कोण ?

**गबरु**– गबरु कोतवाल.

**सदा**– शाब्बास रं माझ्या गबरु. काय पण नाव हाय.

**सगन**– कोतवालसाहेब, ह्या गावचं नाव काय हो ?

**गबरु**– पहिलं सांगू की दुसरं सांगू ?

**सदा–** आमच्या ध्यानात नाही आलं.

**गबरु–** त्याचं काय हाय राव, काय हो तुमचं नाव काय ?

**छगन–** आहो आधी गावाचं नाव सांगाना ?

**गबरु–** ते काही नाही. आदी सान्यानी नाव सांगा. आन् मगच गावच्या हद्दीत पाऊल टाका. परक्या मानसांची ओळख पटल्याशिवाय कुनाला गावच्या हाद्दीत घ्यायचं नाही असा पाटलाचा हुकूम हाय.

**सदा–** अस्स होय ? ठीक आहे. हे बघा, माझं नाव सदा गबाळे. ही माझी बायको कल्पना. हा सगन आणि तो छगन.

**गबरु–** तुमचं नाव काय म्हनाला ?

**सदा–** सदा गबाळे.

**गबरु–** काय रं गबाळ्या. हे सगळं गबाळं घेऊन कुठं चाललास ?

**सदा–** आम्ही तमाशगीर मंडळी आहोत.

**गबरु–** हे खरं कशावरनं ?

**छगन–** काय राव हे काय बोलनं झालं ? म्हने खरं कशावरून ? तुम्हाला आमची हत्यारं दिसत नाहीत का ? सगन तू तुझं हत्यार दाव. मी माझं दावतो.

(ते दोघं गबरुला डुलची पेटी दाखवतात.)

**गबरु–** काय हो ह्या बाईचं आन् तुमचं नातं काय म्हनाला ?

**सदा–** नवरा बायकोचं.

**गबरु–** पन तसं दिसत नाही.

**छगन–** अहो, नवरा बायकोचं नातं वरच्यावर कसं दिसल ?

**गबरु–** कसं दिसल म्हणजे ? पायात जोडवी गळ्यात मंगळसूत्र. हे काय असतं का न्हाय ?

**सदा–** त्याचं काय हाय गबरु शेट. तमाशातल्या बाईच्या गळ्यात मंगळसूत्र बघितलं की दौलत जादा करनाऱ्यांच्या नोटा बाईकडं येण्याऐवजी खिशातच जाऊन बसतात.

**छगन**– सदाभाऊ, जरा थांबा, कोतवाल जरा माझं ऐका. तुमची शंका अशी की ह्या बाई ह्यांची बायको कशावरून. खरं ना ?

**गबरु**– हो.

**छगन**– काय राव कसली शंका घेताय ?

**सगन**– नाही म्हटलं कोतवाल आता तरी तुमच्या गावचं नाव सांगा.

**गबरु**– या गावाचं पहिलं नाव होतं, उचल्याची वाडी.

**सदा**– आत्ता काय म्हणत्यात.

**गबरु**– सौदापूर.

**सदा**– सौदापूर म्हणजे पहिल्यांदा उचला उचली करूनशान जमा झालेल्या भांडवलाच्या गाठोड्यावर तुमी गावाचा सौदा सुरू केलेला दिसतोय.

**गबरु**– ते आमच्या पाटलास्नी इचारा.

**सदा**– गावात एकादी धर्मशाळा हाय का ?

**गबरु**– कशाला ?

**सदा**– आमाला मुक्काम करायला. रात्री आम्ही इतं तमाशाचा खेळ करणार आहोत.

**छगन**– नाही म्हटलं तुमी पन कोतवालीन बाईस्नी एक दिवसाची रजा देऊन या आमचा तमाशा बघायला.

**गबरु**– तुमी धर्मशाळेत राहिलेलं आमच्या पाटलांना आवडणार नाही.

**छगन**– का ?

**गबरु**– आवं असल्या थंडीच्या दिवसात या बाईस्नी घेऊन तुमी धर्मशाळेत कसं झोपणार ?

**सदा**– रोज झोपतो तसचं.

**गबरु**– आमच्या पाटलानी ह्या बाईस्नी बघितलं तर सवताची माडी ह्यांच्यासाठी खाली करून देतील. आन रातभर सवता सेवेला हजर रहातील. आन तुमा तीगास्नी बाहेरचा व्हरांडा मोकळा करून देतील. आमचं पाटील तसं लई मोठ्या मनाचं हायती.

सदा– तुमच्या पाटलाचं मन कळलं आमाला.

गबरु– अवो आमचं पाटील, म्हणजे पाटीलच हायती. लई मोटा रंगेल मानूस हाय.

छगन– सदाभाऊ याच्या पाटलाचं सारंच मोटं दिसतंय.

गबरु– ते लई मोटं बारदान हाय. एका तळावर पन्नास एकर उस हाय त्यांचा.

सदा– मग ते बारदान आमाला बगायलाच पाहिजे.

गबरु– मी नाव इसारलो तुमचं.

सदा– सदा गबाळे.

गबरु– ह्या बाईसनी मी कुटतरी बघितल्यासारखं वाटतंय.

छगन– बहुतेक स्वप्नात बघितलं असेल.

गबरु– न्हाय न्हाय. माजा माझ्या डोळ्यावर इसवास हाय. एकादी चांगली बाई एकदा का मी बघितली की, मी तिला कंदीसुदिक इसरत नाय

सदा– हा तुमच्या स्वभावाचा गुण दिसतोय. बरं, आता आमचं हे गबाळ कोणत्या खुंटीला अडकवायाचं, तेवढं सांगा बघु.

गबरु– म्हणजे ?

छगन– आम्हाला धर्मशाळेचा रस्ता दाखवा.

गबरु– थांबा राव, मदी मदी बोलू नका. काय हो बाई तुमाला मला कुटं बघितल्यासारखं वाटत नाही ?

कल्पना– वाटतंय ना.

गबरु– तेच म्हणतो मी ? काय हो बाई ? तुमाला एकादी भन होती ?

सदा– आता यांच्या बहिणीवर घसरला ?

बगरु– मला वाटतं बाईस्नी एकादी भन असावी.

कल्पना– मला आठवत नाही.

**गबरु–** मग ती कोण असावी ? एक बाई अक्षी उगळी निगळी तुमच्या सारखी माझ्या बगन्यात आली होती.

**सदा–** हां हां आलं लक्षात. मी सांगतो. बर का कोतवाल, जी बाई अक्षी ह्यांच्या सारखीच बघीतली होती असं म्हणताय ना. त्या बाईची आई मागं ह्यांच्या शेजारी राहात होती. आन त्या बाईचा बा लई मोठ्या मनाचा मानूस होता. शेजारी पाजारी कुणी अडल्या नडल्याली बाई असली तर, ते तिला तन, मन, धन देऊन मदत करायचे. मला वाटतय तुमी बघितलेली बाई, जी ह्या बाईनसारखी दिसायला होती ती बहुतेक ह्यांच्या बानं अडीअडचणीला केलेली मदत असेल.

**छगन–** म्हणजे कोतवालानी पाहिलेली ती बाई कल्पनाबाईची सावत्र बहिणच झाली म्हणा की.

**गबरु–** आवं आमच्या पाटलांनी ह्या बाईस्नी बघितलं रे बघितलं की लगीच वळकतील.

**सदा–** काय ?

**गबरु–** ह्या बाई कोन आन त्या बाई कोन ?

**छगन–** म्हणजे, त्या बाईस्नी पाटलानी आपली माडी खाली करून दिली होती ?

**गबरु–** आता हे काय इचारनं झालं का ?

**सगन–** सदाभाऊ, मला हितं काहीतरी घोटाळा दिसतोय. आपान ह्या गावात मुक्काम करन्याच्या ऐवजी पुढच्या गावाला जाऊया.

**छगन–** तुला त्या पाटलात रावण दिसयला लागला की काय ?

**कल्पना–** मी सांगू.

**सगळे–** सांगा.

**कल्पना–** इथंच आपल्या वगाला सुरुवात होत आहे.

(सदा व त्यांचे साथीदार रामराम घ्या तुमी मंडळी हे गणगीत प्रेक्षकांच्या समोर सादर करतात. कवना बरोबर हळूहळू पडदा स्टेजला झाकून टाकतो)



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र 98809 नों. दि 9.8.81
वि. नाटक ........

# गण

राम राम घ्या तुम्ही मंडळी
आशिर्वाद परि आम्हास द्या.
तुम्हीच आमुचे विघ्न हरेशा
सेवा आमुची मानून घ्या
खेळ आमुचा नऊ रसांचा
ढंगदार नवटं की बाण्याचा
उघड्या प्रीतीचा प्रपंच करूनी
भवसागर तरून जाण्याचा
जिवा शिवाचा संबंध शोधण्या
खेळ तो विषयाशी शिवाशिवी
कुणी होते राधा, कुणी होतो कान्हा
पुरषी मावशीला फुटतो पान्हा
लाडी गोडीचा करून बहाणा
मन लावितो हरि चरणा
उघड्या शब्दाच्या आम्ही गौळणी
वस्त्राविन का तुम्ही बघता मनी
मोक्षाची ती वाट सोडूनी
माडी का तुम्ही आणता मनी
हरजाईचा अमुचा चाळा खोटा
परि मजबुत अमुचा कासोटा
रोज अमुचा नवा गांव
रोज नवा चारापाणी
तुम्हा मानुनी श्रीहरी
गातो आम्ही तुमची गाणी

# मध्यंतर

(पुन्हा जेव्हा पडदा बाजूला सरतो तेव्हा दृश्य सौदापूरच्या ग्रामपंचायतीच्यां बैठकीच्या दालनाचं आहे. अशी कल्पना आहे. बैठकीवर पुढील नेते बसलेले आहेत. १) सरपंच– रंगराव रानबोके, २) दौलतराव पाटील (गावचे पोलिसपाटील) ३) गोडबोले गुरुजी– गावचे मुख्याध्यापक ४) सत्यशोधक गुपचुप– एक समाज सेवक, ५) गबरू कोतवाल जो दारात उभा आहे. हे सर्वजण सदा गवाळे आणि त्याच्या साथीदारांची वाट पहात आहेत, आज इथ खाजगी बैठक आहे तेव्हा सरपंच)

**रंगराव–** अर गबरु...

**गबरु–** जी

**रंगराव–** नव्ह, तुझी ती तमासगीर मंडळी येणार आहेत की न्हाय ? का तू आमास्नी रातभर नुसत ताटकळत ठेवणार आहेस ?

**गबरु–** अवो, येनार म्हनजे काय ? येनारच. ती मंडळी निम्या अर्ध्यावर आली सुदीक असतील.

**दौलत–** मी म्हनतों, तू त्यास्नी संग घेऊन आला असतास तर काय तुझ्या बाच्या झोळीत धोंडा पडला असता? नाहीता ते तिकडं झोपन जायचे आन आमी हिडक डुलक्या घेत न्हायचो.

**गबरु–** अवो मी माझ्या सवता डोळ्यांनी बगून आलो ती नाचणारी बाय लुगड नेसत व्हती.

**गोडबोले–** काय रे ? साडी कसली होती ? पाचवारी की नऊवारी.

**सत्य.–** अहो गोडबोले गुरुजी मी म्हणतो त्या बाईला बगायच्या अगोदर तीच्या साडीची लांबीरुंदी कशाला मोजतोय.? आपण काही इथं वस्त्रहरणाचा प्रयोग करणार नाही.

**गोडबोले–** अहो सत्यशोधक, मला म्हणायचंय पाचवारी साडीपेक्षा नऊवारी साडी नेसायला जरा वेळ जास्त लागतो नऊ वारी साडी नेसायची

म्हणजे, चांगलं चोपूनचापन माघनं पुढनं वधावं लागतं. पाठीम गच्या नीरीचा काड एकेरी रेल्वेलाईन प्रमाणे अगदी सरळ सोट यावा लागतो.

**सत्य.**– तुम्ही गुरुजी म्हणजे सगळ्या जगाला शहाणपणा शिकवणारच आणि त्यातल्या त्यात बोलायचं म्हणजे बायकांच्या नीऱ्याशी तुमचा घनिष्ट संबंध.

**गोडबोले**– अहो सत्यशोधक गुपचुप. मी म्हणतो आडनावाप्रमाणे कधीतरी गुपचुप तुम्ही तुमच्या बायकोच्या पातळाच्या नीऱ्या एकांतात तरी बघितल्या होत्या का ? नाही म्हणजे मला म्हणायचय साऱ्या गावात पाडव्याच्या ओवाळणी चालायच्या आणि त्या दिवशी तुमच्या घरी मात्र भाऊबीज असायची खरं की नाही ?

**सत्य.**– हे हे बघा, तुम्हाला माझ्या वैगुण्यावर बोट ठेवायचं काही कारण नाही. हे सांगून ठेवतो.

**गोडबोले**– नाही म्हणजे, तुम्ही साऱ्या जगाचे सत्यशोधक म्हणून म्हणालो.

**दौलत**– आरं ए गोडबोल्या गुरुजी, जरा गप्प गीळ की, च्या आयला तुम्हाला तुमच्या बान कंदी गोड बोलायला शिकवलं होत का नाही ? का आपलं आडनावच नुसतं गोडबोले. आन का र सत्यशोधका गुपचुप तू गुपचूप बसायला काय घेशील ?

**सत्य.**– पण ते बघा ना.

**दौलत**– ते तुझं काय बघणार ? तुझं काय हाय ते साऱ्या गावाला ठावं हाय. मी म्हणतो आपलं भांडवल जरा कमी हाय तवा जरा गुपचूप बसायचं.

**रंगराव**– आरं गबरु... ?

**गबरु**– जी.

**रंगराव**– नाही म्हटलं, काई चनंफुटानं खारीवुंदी आणलीस का ?

**गबरु**– ते सामान अक्षी रेडी ठेवलंय.

**रंगराव**– आन हे बघ, आज मुसुंबी– नारिंगी अजिबात आणू नको. सरळ भावाच्या भट्टीवरची पहिल्या धारेची घेऊन ये.

**गबरु**– ती कवाच घेऊन आलोय.

रंगराव– मी तुझ्या घेन्याचं न्हाय इचारलं. आज काय रे ह्या सत्यशोधकाची काही येवस्था केलीस का न्हाय.? त्याला बाय बाटली मदल काई चालत न्हाय म्हनून इचारलं.

गबरु– त्यांच्यासाठी दोन पावशेर गाईचं दूध आणलंय.

दौलत– बरं का रंगराव, ही मुसुंबी नारिंगी पेण्यापेक्षा मी म्हणतो...

रंगराव– थांबा... तुमचं वाक्य मी पुरं करतो. ह्या मुसुंबी नारंगीपेक्षा एकाद्याचा मूत पेलेला बरा.

(त्याचवेळी सदा गबाळे आणि त्याचे इतर साथीदार प्रवेश करतात. तेव्हा सदा गबाळे सर्वांना उद्देशून)

सदा– रामराम मंडळी, काय चहापाणी चाललेलं दिसतंय.

रंगराव– या या या रामराम वसा. गोडबोले गुरुजी उटा बगू. पावन्यास्नी आपल्या सान्यांची चटदिशी ओळख करून द्या. म्हनजे लागलीच आपल्याला पुढच्या कामाला हात घालता येईल.

गोडबोले– मित्र हो आज आपण या ठिकाणी—

दौलत– ए मास्तर, कुनाच्या मयताला जमलेलो न्हाय.

गोडबोले– कळालं कळालं, एकदम कळालं. पाटील तुमचा विनोद आमच्या ध्यानात आला. मित्रहो पाटलांना घाई झालेली आहे. तेव्हा मी ओळख करून देण्याचं काम लवकर संपवणार आहे.

मित्रहो, हे आमचे रंगराव रानबोके, सरपंच सौदापूर. आमचे सरपंच नावाप्रमाणे रंगदार असून समाजसेवा करीत असताना गावातून किंवा गावाच्या पंचक्रोशीतून फिरत असताना जर एखादं नवं पाखरु ह्यांच्या दृष्टीस पडले तर ते त्याची विचारपूस केल्याशिवाय कधीही पुढं जात नाहीत. परस्त्रीबद्दल आपलेपणा दाखविणे हा त्यांच्या स्वभावाचा खानदानी गुण आहे. आणि ज्या ज्या ठिकाणी प्रतिपक्षाच्या इच्छेविरुद्ध जाऊनसुद्धा त्यांना आपलंसं केल्याशिवाय हे कधी शांत होत नाहीत मला वाटतंय याप्रसंगी आदरणीय सरपंचाची ओळख पुरे आहे.

**गोडबोले–** मित्रहो, यानंतर दुसरी ओळख म्हणजे आमच्या आई पांठरीचा मेंडा– आमच्या गावचे पोलीस पाटील. हे एक फार मोठं प्रस्त आहे. जनतेची दौलत नकोत्या मार्गाने खर्च होऊ नये म्हणून ह्यानी ती आडमार्गांनी आपल्याजवळ सुरक्षित ठेवली आहे. हे आमचे बागाईतदार म्हणून आमच्या गांवात, आमच्या जिल्ह्यात, आमच्या देशात ओळखले जातात. गावात येणाऱ्या तुमच्यासारख्या त्यातल्या त्यात स्त्री कलाकारांना ह्याच्या माडीवरून नवीन साडी नेसून परत जाण्याचं भाग्य लाभलं आहे थोडक्यात सांगायचं म्हणजे ह्यांची दौलत फार मोठी आहे.

मित्रहो, यानंतर आपण हळूच सत्यशोधक गुपचुपांच्याकडे वळू. गुपचुप हे ह्यांचं आडनांव. आणि सत्यशोधक ही ह्याना आम्ही दिलेली पदवी आहे आडनावाप्रमाणे ह्यांची सारी कामे गुपचुप चाललेली असतात. गांवातल्या पोरीबाळींना किंवा बायाबापडयाना किंबहुना मी म्हणेन ह्याच्या धर्मपत्नीला ह्याच्या पुरुषी स्पर्शाचा कधीही उपद्रव झालेला नाही. मित्रहो, आता शेवटी ओळख करून द्यायची ती म्हणजे माझी. माझं नांव मु का. गोडबोले. मुका म्हणजे मुकुंद काशिनाथ तुमच्या ओठात येतो तो नव्हे. मी इथल्या शाळेत एक साधा हेडमास्तर आहे सरपंच आणि पाटील यांच्या सोबतीने मी सुखात आहे ते जेव्हा जेव्हा जे जे काही वेळी अवेळी करतात त्यात मी सक्रीय भाग घेत असतो. तेव्हा आता पाहुण्यानी आपली ओळख करुन द्यावी.

**सदा–** आमी कलाकार माणसं. आमची ओळख आपण आमच्या कलेवरून करून घ्यावी एवढीच विनंती. तुमच्यासारखी भाषणं आम्हाला जमणार नाहीत.

**दौलत–** आन् भाषणं द्यायची म्हणजे ओळख हुताहुताच रात्र संपायची खर की न्हाय ?

**रंगराव–** म्हणून म्हनतो आता लवकरात लवकर तुमी तुमचा कार्यक्रम सुरु करा.

**सदा–** तरी पन मी आमची एका वाक्यात ओळख करून देतो. मी सदा गबाळे, हा छगन विसरभोळे, तो सगन खरसुंडीवाले, आणि या कल्पना-

बाई कोल्हापूरकर. बस. तवा एक दोन मिनिटात आमी आमचं हत्यार लावून घेतो (आन कार्यक्रमाला सुरुवात करतो.)

**रंगराव–** चालेल. तवा तवा आम्हीं आमच्या बाटल्या फोडतो. गबऱ्या त्या बाटल्या आण खारीबुंदी घेऊन ये.

**गोडबोले–** आणि त्याबरोबर सत्यशोधकाचं दूध आणायला विसरू नकोस.

**दौलत–** नाही म्हटलं– नाव काय म्हनलं तुमचं ?

**सदा–** सदा गबाळे.

**दौलत–** गबरु एक दोन बाटल्या आपल्या पावन्यास्नीबी दे.

**सदा–** आमी घेतो पन कार्यक्रम झाल्यावर त्याआधीं न्हाय. तवा तुमचं चालू द्या.

**दौलत-** बरं बरं. ठीक हाय ठीक हाय.

(गबरु साऱ्याना मद्य आणून देतो. तोपर्यंत ही कलाकार मंडळी तयार होतात. कल्पनाबाई प्रथम एक नृत्याचा तुकडा पेश करून मग गाण्याला सुरवात करते.

## गाणं

फेकू नका हो चवल्या पावल्या
माझ्या रुपात आईच्या सावल्या
म्हणू नका मला हो नाची
मी मामाची लाडकी भाची
मारू नका हो नजरेची फेक
आणा मनात मी तुमची लेक
तुमच्या डोळ्याच्या उलट्या बाहुल्या
कुणा म्हाताऱ्या डोळ्याची खूण
काहो बघाना माझ्यात सून
नका नजरनं दाऊ शेज

वघा माझ्यात तुम्ही भाऊबीज
कुणी नाही रं दादा मला धावला
तुमच्या डोळयात नशेची छाप
द्या कुणी हो मला आईबाप
भाऊ गर्दीत येऊ नका कुनी
मला हवा तो एक घरधनी
अजून नाही रं देव मला पावला.

(हे गाणं ही पुरुष मंडळी रस घेऊन ऐकत असतात. हळूहळू त्यांची नशा वाढत जाते. श्री. सत्यशोधक आपली जागा सोडून कल्पनाबाईचा चेहरा न्याहाळू लागतात. जेव्हा दोघांची चार दोन वेळा दृष्टादृष्ट होते तेव्हा सत्यशोधक भांबावल्यासारखे वागू लागतात. त्याच्या हातापायाना कंप सुटतो. घसा सुकून जातो. चेहरा घामानं भिजतो आणि शेवटी (ते वेड्याप्रमाणे हावभाव करीत वक्तव्य देतात.)

**सत्य.**– पार्वत, पार्वती– पार्वती मला माफ कर. मी विश्वासघात केला तुझा. मी फसवलं तुला. तुझ्या साऱ्या आकांक्षा धुळीस मिळविल्या. मी भ्याड आहे. मी भित्रा आहे. मला क्षमा कर मी तुला वाचवू शकलो नाही. जगाचं सत्य शोधणाऱ्या माझ्या डोळ्यानी तुझ्या शरीराची विटंबना पाहिली. पार्वती., पार्वती मला क्षमा कर.

मी तरी काय करू .. मी असाह्य होतो. इच्छा असूनही मी काही करू शकलो नाही. त्या नीचनराधमाच्या कुष्णकारस्थानानी तुझा बळी घेतला. पार्वती पार्वती... मला क्षमा कर·

(असे म्हणून सत्यशोधक कल्पनेच्या पायावर कोसळतो )

**रंगराव**– च्या आईला. गवऱ्या सालया तू या सत्यशोधकाला दूध दिलंस की दुसरं काय दिलंस ? बग साला कसा बरळतोय स्वतःची बाईल वाटली दुसऱ्याला आन आता साला रडतोय बाईच्या पायात लोळतोय.

**दौलत**– गवऱ्या, त्या बाईची साडी फेडून वे अन् ह्या सालया सत्यशोध-

काला नेसव आन पाठव त्याला माझ्या खोलीत. मग बग साल्याला कसा आई बनवतो ते.

**गोडबोले**– बाई, वा ऽऽई तुम्ही भिऊ नका. तुमची साडी या सत्य-शोधकाला देऊन टाका, आणि तुम्ही चला माझ्याबरोबर. एकांतात गप्पा मारायला. मी तुम्हाला मधुचंद्राचा पहिला धडा घडघडा, शिकवितो, हाडाचा मास्तर आहे मी. (असे म्हणून ते गबरुला मिठी मारतात. सदा आणि त्याचे साथीदार तिथून निसटतात. इतरांच्या मर्कट चेष्टा चालू असतांनाच स्टेज अंधारात नाहीसे होते. पुन्हा जेव्हा स्टेजवर प्रकाश येतो तेव्हा सदा गबाळे एक लावणी रचण्यात गुंग असतो. त्याचवेळी कल्पना त्याच्या पाठी येऊन उभी रहाते. शाहीराच्या कवि मनाचा प्रसन्न विलास पाहून ती प्रसन्न होते. नंतर जवळ जाऊन ती त्याच्या खांद्यावर हात ठेवते. शाहीर भानावर येतो )

**कल्पना**– आज स्वारी बरीच खूष दिसते.

**सदा**– बघाना कशी फक्कड लावणी जुळली ते

तुझ्या वयाची गद्दे पंचविशी
ओठावरची नको पिळू मिशी
मी सोळाची सुंदर खाशी
येणार नाही रे तुझ्यापाशी.

**कल्पना**– सुंदर फारच सुंदर मी सांगू ही लावणी कुणाला बघून सुचली ती ?

**सदा**– सांग.

**कल्पना**– त्या रानबोक्या रंगरावाला बघून.

**सदा**– अग तो रानबोक्या काय आन् गावचं खाऊन माजलेला पाटील काय? साले एकाच औलादीचे. ह्या भडव्याना शिरा म्हणून शेन आन भाकरी म्हणून. शेनी दिल्या ना, तरी हे आवडीनं खातील. ह्याना फकस्त एका शेपटाची आन् दोन शिंगाची कमी आहे. परवा राती त्या हरामखोरांचा

नंगानाच बघून माझी अक्कल पार गुंग झाली. बरं झालं येळबऱ्यावर हुती न्हायतर हैक म्हनता ब्रह्महत्या झाली असती.

**कल्पना–** मला त्या बिचाऱ्या सत्यशोधकाची फार कीव आली. त्याने तर सरळ माझे पायच धरले. म्हणे...पार्वती पार्वती मला माफ कर. कोण पार्वती आणि कोण शंकर.

(याचवेळी गबरु येतो. गबरुने येताना रंगराव रानबोक्यानी दिलेली साडी आणली आहे. तो सदाला हाक मारत स्टेजवर प्रवेश करतो.)

**गबरु–** गबाळ्या, ए गबाळ्या, आरं हायस्का ?

**सदा–** कोन गबरुशेट ? या या या गबरुशेट.

**कल्पना–** काय कोतवाल ? आज सकाळीच सकाळीच वाट वाकडी केलीत.

**गबरु–** काय करनार तुमी काई आमच्या सरपंच सायबास्नी चैन पडू देत नाही.

**कल्पना–** मी काय केलं त्यास्नी.

**गबरु–** म्हणे मी काय केलं ? अहो सारखं तुमचंच चित्र त्यांच्या डोळ्या-पुढं उबं न्हातय, आज सकाळी सकाळी त्यास्नी तुमची लई दाट सई आली.

**सदा–** सरपंचीनबाई माहेराला गेलेल्या दिसतायत ?

**गबरु–** नाही. त्या इथंच हायती. त्याचं काय हाय. समद्या बाबतीत आमच्या सरपंचाची भूक लई दांडगी हाय। त्यास्नी तुमची सारखी सई होते.

**कल्पना–** अच्छा। आन काय हो कोतवाल ? सरपंचास्नी आमची सई होते आन तुम्हाला काई आमची सई होत न्हाय.

**गबरु–** अवो आमाला मोप सई हुईल पन आमाला इचारनो कोन ? आम्ही आपलं उष्टावळीचं धनी, पहिल्या पंगतीला आपला कुनी थोडाच जेवायला वाढणार आहे ?

**कल्पना–** आन समजा, वाढणाराची इच्छा असेल तर ?

**गबरु–** मग मी काय खायला न्हाय म्हनतोय होय होय ?

**सदा–** बाई, गबरु शेटनी तुमाला भेट आनलेली दिसते

गबरु– आनलीया भेटच. पन ती माझी न्हाय.

सदा-- मग कुनाची ?

गबरु– आमच्या सरपंच साहेबांची. सकाळी चावडीवरनं चाललं होतं. तवा मला म्हणाले पंचायतीत ये माझं काम हाय. मी गेलो. तवा म्हनाले ही साडी कल्पनाबाईस्नी देऊन ये आन त्यास्नी माझा निरोप सांग. ते म्हनले कल्पनाबाईस्नी म्हनावं आज संध्याकाळी मकचा हुरडा खायला मळ्यात मुक्कामाला या.

सदा-- एवढाच निरोप.

गबरु-- अजून हाय की. ते म्हनाले. मग काय ? कळला तुमचा निरोप ?

कल्पना-- चांगलाच कळला.

गबरु– मग सरपंच साहेबास्नी काय सांगू ?

कल्पना-- त्याना म्हणावं तुम्ही तयार रहा.

गबरु– बगा ? इसराल नाहीतर.

कल्पना– अरे हे काय विसरण्यासारखं बोलावणं आहे का ? कोतवाल !

गबरु– जी.

कल्पना-- नाही म्हटलं तुम्ही आम्हाला काही चहापाण्याला बोलवणार की नाही.

गबरु– तुमी, आन माझ्या घरी चहापाण्याला येणार. गरीबाची चेष्टा करताय व्हय बाय ?

सदा– अरे बाईस्नी श्रीमंत माणसापेक्षा तुझ्यासारखी माणसंच जास्त आवडतात.

गबरु– खरं म्हनता ?

सदा– एकदा बाईस्नी चहापाण्याला बोलावन तरी बघ. म्हनजे कललं.

गबरु– आसं आसलं तर मी निरोप बदलून टाकतो.

सदा– कोणता ?

गबरु– रंगराव रानबोक्यास्नी सांगतो– बाईस्नी आज अडचण हाय. आज

त्यास्नी यायचं न्हाय, आन घरी जावनशान बाईच्या चहापाण्याची तयारी करतो (त्याचवेळी सत्यशोधक गुपचूप तिथे येतात.) मग आपलं ठरलं तर.

सदा– अगदी नक्की ठरलं साडी सरपंचाची आन चहापानी गवरुशेटचं.

गवरु– मग येतो मी.

सदा– तुम्ही व्हा पुढं. बाई मागनं आल्याच.

(गवरु निघून जातो. तेव्हा सत्यशोधक कल्पनेला उद्देशून)

सत्य– मी माफी मागायला आलो होतो तुमची.

कल्पना– ती का म्हणून ?

सत्य– त्या रात्री जो प्रकार घडला त्याबद्दल मी दिलगीर आहे.

सदा– काय हो सत्यशोधक ? त्या दिवशी आटा सरकल्यागत तुम्ही काय करत होता ? ही पार्वती कोन ?

सत्य– माझी बायको.

सदा– लग्नाची ?

सत्य-- बायको म्हटल्यावर लग्न आलंच.

सदा-- मग तिचं झालं काय ?

सत्य-- खून.

सदा-- खून ? आन कुनी केला ?

सत्य-- मी.

सदा-- काय ? तुमी तुमच्या बायकोचा खून केला ?

सत्य.– हो.

सदा– तरीच त्या दिवशी वात झाल्यागत तुमी बडबडत होता.

सत्य.– हो. त्या दिवशी कल्पनाबाईना बघितलं आणि मला माझ्या पार्वतीची आठवण झाली.

कल्पना– ती दिसायला माझ्यासारखी होती.

सत्य.– हो, अगदी तुमच्यासारखी. फुलांशी बोलायची. मुलांशी खेळायची. सदा आपल्याच नादात गुंग असायची. माझ्यावर जीवापाड प्रेम करायची.

सदा- म्हणून तुम्ही तिचा खून केलात.

सत्य.- कितीतरी वेळा जीव तोडून तिनं मला सांगितलं होतं, हे सत्यशोधकाचं काम बंद करा. बिबा आपल्या तेलानं जळतो. ती माणसं चांगली नाहीत. ती एखादे वेळी तुमचा घात करतील. आणि झालं तसंच. त्या नीच नराधमानी माझ्यावर सूड उगवला आणि मला माझ्या पार्वतीचा शेवट करावा लागला काल तुम्हाला पाहिलं आणि गतजीवनाचं सारं चित्र डोळ्यापुढं उभं राहिलं.

सदा- म्हणजे तुमची बायको दिसायला आमच्या कल्पनाबाईसारखी होती ?

सत्य.- हो.

स ा- तिला नाचायला येत होतं ?

सत्य. छे छं. भलतच काय विचारता ? ती बिचारी साधीभोळी होती.

सदा-- साधीभोळी होती ना, मग बरं झालं. आमची कल्पनाबाई सादी बी न्हाय, आन भोळी बी न्हाय. तवा आता लक्षात ठेवा पुना कदी तसा झटका आल्यासारखं वागू नका.

कल्पना- तरीच मला बघितल्यावर, तुमचा गबरु कोतवाल म्हणाला होता. बाई तुम्हाला कुठंतरी बघितल्यासारखं वाटतंय.

सदा-- काय हो सत्यशोधक, तुमची बायको जर इतकी गुणी होती, तुमच्यावर मरत होती. तर मग तुम्ही तिचा खून का केला ?

सत्य -- केला नाही. करायला लावला, त्या नीच नराधमानी.

सदा-- तेंच मी म्हणतो, तुमी आसं का केलं ?

सत्य-- सांगेन पन एका अटीवर ?

सदा-- जिकडं जावं तिकडं अटी आन कटकटी. बरं, सांगा बगू तुमची अट.

सत्य-- अजून दोन चार दिवस तुमी तुमचा इथला मुक्काम वाढवा. तुम्ही जर तुमचा मुक्काम वाढविला तर माझ्यावर फार उपकार होतील.

कल्पना- ते कसं ?

सत्य-- ते आत्ताच नाही सांगणार. या साल्यांच्या पापाचा घडा फोडल्या-

शिवाय मी राहणार नाही.

**सदा**-- काय हो ? तुमी तुमच्या पापांचा घडा फोडणार आन् त्यात आमची डोकी फुटली मग—

**सत्य.**-- मी माझ्या पार्वतीची शपथ घेऊन सांगतो. तसं काही होणार नाही. ते तुम्ही माझ्यावर सोडा.

**सदा**-- काय सोडायचं ते सोडा. आन काय धरायचं ते धरा पन चार दिवस झालं की आम्ही हे गाव सोडनार हे ध्यानात ठेवा.

(सत्यशोधक निघून जातो- तेव्हा कल्पना)

**कल्पना**-- तुम्ही त्या सत्यशोधकाला वचन कशाला दिले ?

**सदा**-- पापाचा घडा कसा फुटतो ते बघायला,

**कल्पना**-- आन काही गळ्याशी आलं म्हणजे ?

**सदा**-- भोगायचं, बरं कोतवालाच्या चहापाण्याचं काय ?

**कल्पना**– काय करायचं म्हणजे ? प्यायचा.

**सदा**– आन काय कमी जास्त झालं तर ?

**कल्पना**-- तुम्ही कशाला आहात ? एक काम कराल ?

**सदा**-- कनचं ?

**कल्पना**-- एक साडीचोळी बाजारात जावून घेऊन या. आनं ती रंगराव रानबोक्याच्या घरी पाठवून द्या.

**सदा**-- कशाला ?

**कल्पना**– सांगते ना– आन त्या साडीबरोबर निरोप पाठवा की–सदा गबाळे सरपंचीबाईस्नी मकचा हुरडा चारायला संध्याकाळी घरी येनार आहेत.

**सदा**– झॅक, म्हनजे बसलेल्या गांजण्या उठवायच्या ?

**कल्पना**– हो, अन त्याना सांगायचं. चावा आमाला काय हो तुमची ती सातारी म्हण कोणती--येरे लाकडा...

**सदा**-- सांगतो, पण सगळी म्हण तुमाला सोसायची न्हाय.—आपन इथंच थांबू या. त्याचं काय हाय कल्पना ही गावगुंड मानसं आपल्या डोक्याचा

उपयोग नुसता फेटा थांबायला नाहीतर टोपी घालायला करतात. येळ आली तर हे कमरेचे काढून डोक्याला गुंडाळायला बी कमी करत नाहीत. म्हणून म्हणतो ह्यो हुरडा चहापाणी आपल्याला पचायचा न्हाय.

**कल्पना**-- मग तुम्ही सत्यशोधकाला वचन कशाला दिलंत ?

**सदा**-- मला वाटलं तुला हे आवडेल म्हणून. एकदा तू म्हनाली नव्हतीस का ? संघर्षाशिवाय जीवन नाही. आन पौरुषाशिवाय पुरुष नाही.

**कल्पना**-- ठीक आहे, जशी तुझी मर्जी, पण हे छगन आणि सगन गेले कुठं?

**सदा**- ते गेले पाटलाच्या मळ्यात रस प्यायला. कुनाला कशाचं आन वैत्याला पश्याचं--

(तेवढ्यात छगन आणि सगन येतात त्यांच्याबरोबर एक सद्‌गृहस्थ आलेले आहेत.)

**छगन**- सदाभाऊ आत येऊ का ?

**सदा**- आता आत यायचा काही राहिलायस का ?

**छगन**- त्याचं काय असतं सदाभाऊ, आपन तमाशगीर मानसं रातभर नाचगानी करीत असतो. त्यामुळं आपली राती करायची खाजगी कामं तशीच राहून जात्यात. म्हणून दिवसा सवड मिळाली की ती उरकायची असतात.

**छगन**- म्हणून म्हटलं तुमचं काही खाजगी काम चाललं असल तर उरकून घ्या. तवर आम्ही डोळं झाकून घेतो. कसं ?

**सदा**- पाटलांच्या गुऱ्हाळात रसच प्यालास का दुसरं काई घेतलंस ? आनं हे कोन ?

**छगन**- हो सांगतो. तुमच्या भानगडीत सांगायचं राहून गेलं. कल्पनाबाई तुम्हाला हे नवं गिऱ्हाईक आनलंय.

**सदा**- गिऱ्हाईक ? कसलं ?

**छगन**- माल विकत घेणारं, बाईच्याबद्दल पाटलांनी ह्यासनी लई मोप काई सांगितलंय, काय तो आवाज, काय ते नाचनं, काय ते काय काय

करनं. पाटील तर कल्पनाबाईवर एकदम खूष. त्यानीच तर ह्या पावन्यास्नी बाई असावी तर अशी.

**कल्पना**– काय म्हणणं हाय ह्यांचं ?

**छगन**– आपलं दहा कार्यक्रम पायजेत ह्यास्नी. अक्षी वळीनं. हे लई मोटं कूळ हाय, आसं पाटील म्हनालं, तवा ह्यांच म्हनन आसं हाय की राती तुमचं गानं ऐकायच. नाच बगायचा. बाई ह्यांच्याजवळ. तुमचं गानं टिपून घ्यायला टेपरेकॉर्डर का काय म्हणत्याती ना ते हाय. आपला कार्यक्रम ह्याच्या गात्राला जायच्या अगोदर तुमचा गळा ह्यास्नी हवा हाय.

**सदा**– तो काय कापून द्यायचा की काय ह्यास्नी.

**छगन**– सदाभाऊ तुम्ही आगदीच कसे हो हे. गळा द्यायचा म्हणजे गळ्याला गळा न्हाय लावायचा. तर, बाई जवा गानं म्हनत्याल तवा- बाईचं गान आठवणीच्या रेकॉर्डात हे टिपून घेनार. बाईचं सगळं काय ह्यास्नी पसंत पडलं की, लगेच पैशाचं बोलायचं.

**सदा**– बाईचं सगळं काही पसंत पडायचं म्हनजे काय ?

**छगन**– नाचनं, गानं हे, ते बस दुसरं काय ?

**सदा**– ठीक हाय, आपलं नाव, म्हणजे तुमी मोठी मानसं, तुमास्नी नाव इचारायला नको हाय पन इचारायचं म्हणून इचारतो.

**घोरपडे**– मी संताजी घोरपडे मी सोलापूरचा. मी चेअरमन आहे खरेदी विक्री संघाचा. आल्या आल्या आपली खूप तारीफ ऐकली पाटलांच्या कडून. तेव्हा म्हटलं तुमचा कार्यक्रम बघावा. आणि दहा प्रयोगाचं फिक्स करून टाकावं. मी लगेच दोन प्रयोगाचं ॲडव्हान्स देऊन जातो. आणि तुम्ही सांगाल तेव्हा आमची गाडी पाठवून देतो, तुम्हाला सोलापूरला न्यायला.

**सदा**– ते सगळं ठिक हाय पन आज तुमाला आमचा कार्यक्रम दावन जमेल का नाही ते जरा नक्की सांगनं कठीण हाय.

**घोरपडे**– का ?

**सदा** बाईस्नी राती सरपंचाच्या मळ्यात हुरडा खायला जायचंय शिवाय बाईस्नी एका ठिकानचं चहाचंबी बोलावनं आलय. म्हणून म्हणतो आज संध्याकाळी कसं काय जमायचं

**कल्पना**– नाही जमलं तर आपन जमवायचं ? सरपंचाच्या मळ्यात उद्या सुद्धा जाता येईल. हे इतक्या लांबून आलेत म्हणजे ह्यांचा हिरमोड नको.

**सदा**– पन सरपंचासनी राग यील त्याचं काय ?

**छगन**– अवो एक मेली लाडो तर काय ओस पडली वाडी ? आपल्याला काय ? सरपंच नाहीतर चेहरमन. कसं हो बाई ?

**कल्पना**– बरोबर आहे तुझं.

**घोरपडे**– मग मी रात्री येतो.

**कल्पना**-- या ना. मी वाट पाहीन तुमची.

**छगन**– पन चेअरमन साहेब तुमचं ते टेपाचं रेकार्ड आणायला इसरू नका. बाईच्या आवाजाबरोबर आम्हाला आमच्या पेटी तबल्याचा आवाज पन ऐकायला मिळल.

**घोरपडे**– होय. होय. अगदी न विसरता टेपरेकॉर्ड घेऊन येतो, बरं. अच्छा येतो मी.

**सर्व**– या... (घोरपडे निघून जातो.)

**सदा**– छगन्या, लेका ही कुठनं घोरपड घेऊन आलास ?

**छगन**– सदाभाऊ. ही घोरपड न्हाय. पैश्याच्या थंडाव्याची कोरफड हाय. पैसा फेको तमाशा देखो.

**कल्पना**– छगनभाऊजी तुम्हा दोघांकडे एक काम आहे.

**छगन**– सांगा.

**कल्पना**– तुम्ही जरा बाहेर जावून या.

**छगन**– का ? तुमाला अडचण हुतीय हितं ?

**कल्पना**– अहो तसं न्हवं. हे पैसे घेऊन बाजारात जा. आणि यातून एक चागली साडी येक चोळीचा खण व एक नारळ घेऊन या.

**सगन**– कशाला ? कुनाचा साखरपुडा करायचा हाय ?

**कल्पना**– सरपंचाच्या बायकोचा.

**सगन**– कुनासंगं ?

**सदा**– तुझी तयारी आसल तर तुझ्यासंगं. ह्या साऱ्या वस्तू घ्यायच्या आन सरपंचाच्या वाड्यावर देऊन यायच्या. येताना त्यास्नी निरोप सांगायचा. की सदाभाऊ गबाळे राती तुमच्याकडे मुक्कामाला येणार हायती म्हणून.

**छगन**– नाही म्हटलं, हा निरोप दिल्यावर ते तिथून आम्हाला परत येऊन देतील का ?

**कल्पना**– मग साडी चोळी घेताना बांगड्या पण घ्या. आन् जाताना हातात घालून जा. त्या दिवशी मारे रामायणातल्या गप्पा मारत होते. एक म्हणे मी लक्ष्मण होतो तर दुसरा म्हणे मी लंकेची उडी मारतो. मला रावणानं लंकेत बोलावलंय. मी जायचं ठरवलंय. तुम्ही काय करायचं ते तुम्ही ठरवा.

**छगन**– काय सदाभाऊ ? तिथं गेल्यावर आम्ही किती मार खाऊ ?

**सदा**– कोठा साफ होईपर्यंत.

**सगन**– पन तुमचं मत काय ?

**सदा**– बाईची आज्ञा म्हणजे देवाज्ञा.

**छगन**– मग आमाला जायलाच पायजे. चल सगन, जगलो तर पुन्हा भेटूच. नाहीतर आत्ताच रामायण करतो आन वेळ आली की राम म्हणतो. (छगन सगन जाण्यासाठी निघतात. सदा त्याना थांबवतो) आता काय राहिलं.

**सदा**– सरपंचाच्या घरी जाता जाता त्या गोडबोले गुरुजीकडं जावन त्यास्नी म्हणावं, पहिल्या रातीचा घडाघड धडा गिरवायसाठी कल्पनाबाई तुमच्याकडे आज रात्री येणार आहेत. तुम्ही खडू हातात घेऊन तयार रहा. बाई आल्या की, ओनाम्याला सुरवात करू.

**छगन**– अजून काही ?

**सदा**– अरं जरा दमानं घे की ? किती घाई करतोस. त्या गोडबोले गुरुजीकडे जाता जाता पाटलाच्या पन वाड्यावर जा. आन पाटलास्नी सांगा कल्पनाबाई तुमचा उसाचा रस प्यायला रात्री तुमच्या गुऱ्हाळचात येणार हायती.

**छगन**– नाही म्हटलं अजून कुनाला सांगावा द्यायचा राहिला का बगा की?

**सदा**– हो ! राहून राहिला तो, त्यो सत्यशोधक गुपचुप. त्याला सांगा कल्पनाबाईनी तुमास्नी मुक्कामाला बोलावलंय म्हणून.

**छगन**– आलं माझ्या ध्यानात.

**सदा**– काय ?

**छगन**– नाही म्हटलं कल्पनाबाई जाणार च्यापाण्याला, हुरडा खायला, तो धडाधड शिकायचा ओनामा करायला, आनकीन् गुऱ्हाळ गाळायला. तवा तुमी इथं एकटंच राहनार. होकी न्हाय ?

**सदा**– म्हनायचंय काय तुला ?

**छगन**– म्हनायचं काय नाही. पन असं वाटतय सत्यशोधक गुपचुप इथं मुक्कामाला आले म्हणजे एखादा नवा प्रयोग गुपचूप करायचा इचार तुमच्या मनात आलेला दिसतोय.

**सदा**– त्या प्रयोगात मी तुला पन वाटनी दिन, जा काई काळजी करु नकोस. सगळी कामं अक्षी न विसरता करून या.

**छगन**– सगळी काम न विसरता करतो. पन परत येऊ की न्हाय ते सांगता येणार न्हाय. आन समजा नशीबानं जगूनवाचून परत आलोच तर आज आमचा मुक्काम छपरावर. घरात नाही हे लक्षात ठेवा. चलरं सगन्या. (तेदोघे निघून जातात तेव्हा कल्पना)

**कल्पना**– हे काय केलं ?

**सदा**– म्हटलं आग लावायची तर चारी बाजुनी. शेंडी तुटो नाहीतर डोक फुटो

**कल्पना**– मला वाटतय शेंडी पण तुटल आणि डोक पण फुटल.

**सदा**– कुनाची ?

**कल्पना**-- बायकांना शेंडी नसते.

**सदा**-- म्हनून, तर त्यास्नी दुसऱ्याला शेंडी लावायला लई जमते.

**कल्पना**-- बरं ते जाऊद्या. मघाशी तयार केलेली लावणी म्हणून दाखवा, तीच लावणी मी रात्री चेअरमनला म्हणून दाखव.

(सदा लावणी म्हणतो. कल्पना फक्त मुद्राअभिनय करते. ते दोघे हळूहळू एकमेकाजवळ येतात. एकमेकांच्या मिठीत येतात. तेव्हाच स्टेज अंधारांत नाहीसं होतं.

त्यानंतर पुन्हा जेव्हा प्रकाश येतो तेव्हा वेळ रात्रीची. चेअरमन संताजी घोरपडे प्रवेश करतात. त्यांनी येण्यापूर्वीच झोकलेली आहे. ते कल्पनाबाईला हाका मारीत प्रवेश करतात.)

**घोरपडे**-- बाई -- कल्पना आहे...?

**सदा**-- या, आपण घोड्यावर बसून आलेले आहात. याची आम्हाला कल्पना आलेली आहे. ती मी आता कल्पनाबाईस्नी सांगतो.

**घोरपडे**-- म्हणजे तुम्ही कल्पनाबाई नाही ? काय हो ? मी कोण आहे ?

**सदा**– तुम्ही ? तुम्ही चेअरमन.

**घोरपडे**– नाही. आम्ही मन चेअर आहोत.

**सदा**– अच्छा, अच्छा, म्हनजे तुम्ही खेडमंचरच ना ?

**घोरपडे**– तुमी चेष्टा करताय माझी ? पण लक्षात ठेवा साऱ्यांच्या नाड्या माझ्या हातात आहेत.

**सदा**– मग द्याकी एकदमच साऱ्यांच्या नाड्या सोडून म्हनजे बरं वाटल मोकळं वाटल थंडगार.

**घोरपडे**– पन सुरूवात माझ्यापासून झाली पायजे.

**सदा**– ते का ?

**घोरपडे**– का म्हणजे ? मी चेअरमन न्हाई का ? कोनत्याही कामाचं ओपनिंग माझ्याच हस्ते झालं पायजे. तुमच्या त्या कल्पनाबाई कुठायत. त्यास्नी बोलवा लवकर. म्हनजे ओपनिंग करून टाकू.

**सदा**– बाई साडी नेसताईत.

**घोरपडे**– पन काय हो साडीला नाडी कुठं असते ? आमी ओपनिंग कसं करायचं ?

(त्याचवेळी कल्पनाबाई प्रवेश करता.)

कल्पनाबाई, अहो कल्पनाबाई. काठेवाडी घोड्यावरती पुढ्यात घ्यावो मला. मला— मला— राजसा जाऊया जेजुरीला.

कल्पना– अगबाई चेअरमनसाहेब ? तुम्ही केव्हा आलात ?

सदा– त्यास्नी येऊन लई येळ झाला. त्यांची आता जेजुरीला जायची तयारी सुद्धा झाली. त्याचा घोडा बगा कसा थयथय नाचतोय.

घोरपडे– काय हो घोटाळे ?

सदा– घोटाळे न्हाय गबाळे.

घोरपडे– काय म्हनायचय ते म्हना. गबाळे म्हना नाहीतर थदाळे म्हना. पन काय हो घोटाळे, अेक चेअर मिळेल का ?

सदा–' चेअर म्हणजे ?

घोरपडे-- अहो चेअर म्हणजे खुर्ची.

सदा– पन, ती आता तुमाला कशाला हवी ?

घोरपडे– आम्ही आज जेजुरीला जाणार, घोड्यावर बसून.

सदा– मग तिथे खुर्ची कशाला ?

घोरपडे– कशाला म्हनजे काय ? मी चेअरमन आहे. मी आधी खुर्ची घोड्याच्या खोगिरावर ठेवणारा आन् मग तिच्यावर बसून जेजुरीला जाणार.

सदा– एळकोट एळकोट उभे. घोड्यावर खुर्ची आन् खुर्चीवर तुमी ? कल्पनाबाई बेस हाय.

घोरपडे– तुमची कल्पना आवडली आहे म्हणून तर आलो आहे. बाई आता आम्हाला तुमच्या मनाच्या खुर्चीवर बसू द्या. काठेवाडी घोड्यावरती, पुढ्यात घ्यावो मला राजसा, ए राजसा...

सदा– काय हो, काय पायजे ?

घोरपडे– तुमच्या बाईस्नी म्हणावं आमचा घोडा लई अवदळ हाय.

सदा-- त्याची काळजी तुमी करू नका. बाई तुमच्या घोड्याला चांगलाच लगाम घालतील. आन् मी पन येळ आली रे आली की त्याला लगेच कळाव घालीन. तवा आता तुम्ही खिशात हात घाला आन पहिल्या दोन खेळांचा ॲडव्हान्स द्या.

घोरपडे– पन आमचा खेळ केव्हा सुरू होणार ;

सदा-- ॲडव्हान्स दिला की.

घोरपडे-- ठीक आहे. हा घ्या ॲडव्हान्स. (चेअरमन आपल्या बॅगमधून नोटांची बंडले बाईच्या अंगावर फेकतो. ती उचलून घेत बाई गाण्याला सुरवात करतात.

## गाणं

तुझ्या वयाची गध्धे पंचविशी
ओठावरची नको पिळू मिशी
मी सोळाची सुंदर खाशी
येनार नाही रे तुझ्यापाशी ॥ १ ॥

तू आडदांड सातारी खोंड
जरी दिसायला तरणाबांड
तुझं लई चावट फटकळ तोंड
कसं तुझ्या आकलचं फुटलं भांड
ते झाकून घे माझ्यापाशी ॥ २ ।

मी रे वयाची नाजूक कळी
तू पडू नको रे माझ्या गळी
तुझ्या नजरंचा रांगडा बाण
चार चौघात सोडतो भान
पण एक दिवस पडशील तोंडघशी ॥ ३ ॥

ए, धरू नको, हात माझा सोड
लई वंगाळ तुझी ही खोड
तुझा पदराशी भलताच चाळा
थोडा उघड अक्रूचा टाळा
नको घोटाळू रं माझ्यापाशी ॥ ४ ॥

तुझ्या मनातलं हाय मला ठावं
जरा मानसानं सबुरीनं घ्यावं
वराड घेऊन दारात यावं
मानूस हक्काचं वाजत न्यावं
हीच समजना तुला रीत कशी ॥५॥

(बाई नृत्यासह हे गीत पेश करतात. ते गीत संपत असतानाच सरपंच प्रवेश करतात. ते पण घेऊन आलेले आहेत. त्यांच्या हातात सदाने पाठवलेली साडी आहे. ते रागाने बेफाम झालेले आहेत. ती साडी सदाला दाखवत)

**रंगराव**– च्या मायला ! कुठाय तो गबाळेभाऊ सदाळे.

**सदा**-- कोण सरपंच का ?

**रंगराव**-- तुझी आई कुठाय ?

**सदा**-- ती पळाली.

**रंगराव**-- कुणासंग ?

**सदा**-- माझ्या बा संग. माझ्या बा चा हात धरून ती स्वर्गात पळाली. तिची का तुमाला आज आठवन झाली ?

**रंगराव**-- का झाली ते सांगतो ना, आता तुला पन पाठवतो, तुझ्या आईला भेटायला... ही साडी घेऊन.

**सदा**-- सरपंच, साहेब ? तुमाला राग आलाय का हो ?

**रंगराव**– तुझा कसा मला राग येईल ? तू माझ्या बायकोचा नवरा नाहीस का ?

**सदा**– काय राव काय ? भलतंच काय बोलताय ?

**रंगराव**– मग ही साडी कशाला पाठवलीस ? आन् मुक्कामाला कोन येणार होता ?

**सदा**– आता हाय का बरं ! समजुतीचा घोटाळा आन् भायवताच्या चिध्या म्हनत्यात ते ह्यालाच. आमी सगळ्यानी इचार केला, तुमच्या गावात आलो, चार दिवस राहिलो. तवा भावाच्या नात्यानं तुमच्या बायकोला भाऊबीज

करावी, आन पुन्हा कंदी फिरत फिरत, या गावाला आलो. तर तुमच्या ओमगीला मुक्काम करावा.

**रंगराव–** मग हे सारं मला आदि का सांगितलं नाय ?

सदा– कसं सांगणार ? कारण तुमाला आदि आमची आई पायजे हुती. तीला शोधायलाच इतका येळ गेला.

**रंगराव–** बरं ते जावू दे. आमच्या हुरड्याचं काय झालं.

**सदा–** होनार काय ? बोलाचीच कडी आन बोलाचाच भात, गरीबांच्या पाटीत गांवची लात. मी म्हनतो आमी ऐकायचं तरी कुनाचं ?

**रंगराव–** कोन काय म्हनालं तुमाला ? मला त्याचं नाव सांगा. मग बघतो साल्याकडं

**सदा–** कल्पनाबाई तुमची साडी नेसून मळ्यात हुरडा खायला निघाल्या होत्या, तो वर तुमच्या सत्यशोधकाचा निरोप आला.

**रंगराव–** काय म्हणून ?

**सदा–** मी आज कल्पनाबाईकडं मुक्कामाला येणार हाय म्हणून.

**रंगराव–** च्या आयला, जो तो जिकडं तिकडं मुक्कामालाच चाललाय. त्यो भडवा आन हितं मुक्कामाला येनार ? कशाला ? झिम्मा खेळायला की फुगडी खेळायला. (त्याचवेळी सत्यशोधकाचा प्रवेश.)

**सदा–** हे बघा तुमचे सत्यशोधक आलेच. ते त्यास्नी इचारा.

**रंगराव–** काय रे सटवीच्या भडव्या ? तू इथं कशाला आलास ? साला छप्पन चवल्या अन् तीन पावल्या.

**सत्य.–** रंगराव तोंड सांभाळून बोला.

**रंगराव–** नाहीतर काय ? बोट मोडशील की डोळा मारशील ?

**घोरपडे–** काय रे कोन तुमी ? मी चेअरमन हाय ते कळत न्हाय ?

**सदा–** कळतय ना. जरा वाट बघा. अजून पुष्कळ काही कळणार आहे.

**कल्पना–** चला सत्यशोधक आपण आत जाऊया

**रंगराव–** ए ढील्या कमरेच्या ? तू आता कुटं चाललास ? आन् आत जाऊन तू काय करनार रं ? साल्या बाभळीला बोर आन हिरड्याला पोर

कंदी होत नाहीत, हे म्हायीत न्हाय तुला ? आन आता मारे बडीव बैलाचा डौल दावायला बाईबरोबर आत चाललाय? आन काय हो बाई साडी माजी आन गोडी त्या पोचट एरंडाची ?

**कल्पना**– जाता अनुभव घेतल्याशिवाय एरंड हाय की उस ते कसं कळणार?

(तेवढ्यात पाटील हातात ऊसाच्या रसाची कासंडी घेऊन येतात. त्यांची पण गाडी लोड आहे.)

**सदा**– अरे ए छगन्या, ए सगन्या, तुरीत धावा मी सीनकुटात हाय.

**दौलत**– काय रे ? लाबतोंड्या ? कुठं गेली ती तुजी कुडबुळी ? आम्ही किती वाट बघायची ?

**सदा**– कशाची ?

**दौलत**– रस प्यायची ?

**सदा**– थोडी वाट बघायची आन् पिऊन टाकायची.

**दौलत**– काय हो बाई. तुमाला माझा रस प्यायचा नव्हता, मग निरोप कशाला दिला ? साला मी कवाच्यानं ह्या कासंडीत रस घिऊन बसलोय. सारखा लिंबू पिळतोय आलं घालतोय, शेवटी वाट बघून बघून मीच रसाची कासंडी घेऊन आलो. हे बगा माझा रस पार आंबून गेला.

**सदा**– अजून दोन तीन दिवस तसाच राहू द्या, म्हंजे भट्टी लावता येईल.

**दौलत**– ते काही नाही या घडीला माझी भट्टी पेटलेली आहे. त्याचं काय? बाई तुमी माज्या उसाचा अपमान केलात.

(त्याचवेळी गबरु आणि गोडबोले गुरुजी एकमेकाच्या आधाराने प्रवेश करतात. गबरुच्या हातात चहाची किटली आहे आणि गोडबोल्यांच्या हातात मोडका खडू आहे.)

**सदा**– कोन गुरुजी का ? या ! आन करा शाळा सुरू.

**गोडबोले**– हा माझा धडधडीत अपमान आहे.

**सदा**– केला कुनी ?

**गोडबोले**– तुम्ही सर्वांनी.

**सदा**– काय राव ? मास्तर मानसाला खोटं बोलनं शोभतं का ?

**गोडबोले**– मी काय खोटं बोललो ?

**सदा**– तुमी त्यो घडाऽऽ घड शिकायचा घडा कुनाला शिकवणार होता ?

**गोडबोले**– कल्पनाबाईना.

**सदा**– मग त्यानी एकट्यानी तुमाला फसवलं का आमी समद्यांनी ? तुमी तर आम्हा समद्यांची नावं घेताय. आन समजा आमी समदीच तिथं एकदम आलो असतो तर तो घडाऽऽघड शिकायचा घडा तुमी आमा साऱ्यास्नी शिकवलं असता का ? काय राव काय बोलताय काय ? आन् चालताय काय ?

**गोडबोले**– बाईस्नी धडा शिकवण्यासाठी मी केव्हापासून हातात खडू घेऊन उभा होतो. शेवटी वाट बघून बघून तो खडू हातातून निसटला आणि मोडून गेला.

**सदा**– आर ऽ ऽ ऽ र. मग आता तुमची लई मोठी पंचायत झाली. आता तुमचा खडू नीट उमटायचा न्हाय. कारण मदनं मोडला नाही का ? काय गबरुशेट ? तुमच्या चहाला आदण आलं का न्हाय ?

**गबरु**– आधन ? चहा किटलीतल्या किटलीत उकळून पार आटून गेला. हे बघा ! ह्या किटलीच्या तोटीतनं चहातर राहूंद्याच, पन पान्याचा थेंब सुदीन बाहेर यायला मागत नाही.

**सदा**– अरे— अरे— अरे – काय तसमची दुर्दशा झाली हो.

**गबरु**– पन ही केली कुनी ?

**सदा**– त्या सत्यशोधक गुपचुप्यानी. मंडळी खरं सांगतो. वेळात वेळ काढूनशाने कल्पनाबाई तुमचा पाहुनचार घ्यायला येनार व्हत्या. पण ह्या गुपचुप्यांनी बाईस्नी काय गुपचूप भीड घातली काय कळत न्हाय. तुमच्याकडं यायचं बाईच्या मनात होतं. पन त्यांचा नाईलाज झाला ! आता नाईलाजाला काय ईलाज आहे सांगा बगू ?

**रंगराव**– काय रे गुपचूपा नपुसका, त्या बाईस्नी सांगून टाक ना धडधडीत मी बाप्या न्हाय म्हणून.

**सदा**– काय हो सरपंच हे बाप्या नाहीत, हे तुमाला कसं कळलं ?

रंगराव- आरं आमच्या शिवाय कुनाला ठाव असणार. इचारना त्या साल्याला. गोडबोल्या, ऊठ तुझ्या गोडगोड भाषेत या गुपचुपाचं गुपित बाईस्नी सांगून टाक, अगदी पहिल्यापासून सांगून टाक. बरं का कल्पनाबाई याची रंडीबाजी आम्ही करायची आन् ह्या भडव्याच्या नाकाला पदर यायचा. आमची सगळी कुलंगडी ह्या वेशीवर टांगायचा म्हणून केला इचार आन् ह्याचाच गुपचूप काटा काढून टाकला.

सत्य.- नीच नराधमा लक्षात ठेव, देव जागा आहे. शेवटी सत्याला वाचा फोडल्याशिवाय मी गप्प बसणार नाही.

रंगराव साला न्हाई कोन म्हणतय मग सांगून टाकना तुझ्याच तोंडानं तुझ्या बायकोचं काय झालं ते ? आम्ही सगळ्यानी म्हणजे-ह्या दौलतरावानं.

रंगराव- गोडबोल्यानं गबाळ्यानं आणि मी तुला कसा खांबाला बांधून घातला आन् तुझ्या डोळ्यादेखत कसा तुझ्या बायकोवर बलात्कार केला. तो काय वाकडं केलंस तू आमचं. आन् शेवटी तुझ्याच हातानी आमी तिला वीष पाजलं का न्हाय ? बोल आता गप्प का ?

सत्य.- तुम्ही साऱ्यानी माझ्यावर बळजबरी केली.

रंगराव- हो केली. न्हाय कोन म्हनताय. कुनी भीक घातली तुझ्या बोल-ण्याला लक्षात ठेव तू तुझ्या बायकोला वीष पाजतानाचे फोटो आमच्या गोडबोल्यानं काढून ठेवलेले आहेत. एवढंच न्हाय, आमी ज्या ज्या गमज्या तुझ्या बायकोबरोबर केल्या, त्याचं पन फोटो आमी तुला दाखवायसाठी घेऊन ठेवल्यात सवडीने ये आन् बघून जा. कल्पनाबाई तुमाला जर ते फोटो बघा-यचे असतील तर उद्या सकाळी ग्रामपंचायतीत या. गोडाऊनातल्या जुन्या कपाटात ठेवलेले आहेत ते. मग तुमाला कळंल सत्यशोधकाचं खरं रूप.

दौलत- रंगराव एक आयडिया आलीया माझ्या डोक्यात ?

रंगराव- बोल

दौलत- ह्या गबाळ्याला गुपचुपाला आन् ह्या चेअरमनला इथून हाकलून दिवूया आन् जे आपन या गुपचुपाच्या घरी केलं होतं तेच आपण इथं करूया ? काय कल्पनाबाई कशी काय कल्पना ?

(त्याचवेळी सदा गबाळे चौताळून उठतो व कल्पनाबाईच्या संरक्षणा-साठी धावतो तो तिला आपल्या पाठीशी घालून पुढील वक्तव्य देतो)

**सदा**– हरामखोरानो, शेवटी तुमी तुमची जात दाखवलीच. पन लक्षात ठेवा. जोपर्यंत माझ्या जीवात जीव हाय तोपर्यंत मी बाईच्या अंगाला हात लावून देणार नाही. (ते सारे किंचित पुढे सरकतात) तुम्ही समजता इतकी ही बाई स्वस्त नाही.

**रंगराव**– मग तिचा दर सांग

**सदा**– तिचा दर ? तुझ्या बायकोच्या कपाळाचं कुंकू अजून विचार करा आन् मागं फिरा. ही सादी सुदी बाय न्हाय. ती माझी रंगदेवता हाय. माझी आई हाय.

**दौलत**– आरं जरा तुझ्या आईला आमच्याकड पाठव की, म्हणजे मग बघ आमी तुझं बाप हुतो ते.

**सदा**– माझा बाप होशील तवा हो, पयिल्यांदा तुझ्यापुढं उभा राहिलेल्या तुझ्या बाला भेट साला तुमची बोकडाची औलाद. ती जातीवर गेल्याशिवाय राहणार न्हाय. पण लक्षात ठेवा. ह्या माझ्या जगदंबेला हात लावाल ना तर तुमचं हात जळून जातील तुमच्या सात पिढ्या रौ रौ नरकात पडतील.

**दौलत**– पहिल्यांदा आमाला हिच्यासंग जाऊदे. मग आमच्या सात पिढ्या कुठं पाठवायच्या तिथं पाठव. चल हो बाजूला. नाहीतर साला तुझी खांडोळी करून टाकू

**सदा**– अरं जरा तरी आईतला आन् बाईतला फरक ओळख की ? अरं ही साऱ्यांची आई माझी म्हाकूबाई आहे. मायाआक्का, मायाआक्का मला माफ कर. मी... मी... (सदा पुढं बोलायचा प्रयत्न करतो पण त्याच्या तोंडून शब्द निघत नाही. आपली वाचा बंद झाली याची त्याला जाणीव होते व तो तिच्या पायावर कोसळतो ते सारेजण त्याला कल्पनाबाईपासून दूर करणार तोच संताजी घोरपडे जे मुळात इन्स्पेक्टर देशमुख आहेत. चवताळून उठतात. व खिशातील पिस्तूल काढून)

**घोरपडे**– खबरदार, यापुढे तोंडातून एक शब्द बाहेर काढलात किंवा आपली जागा सोडलीत तर.

**दौलत**– ए दमड्या ? आमच्या भानगडीत पडणारा तू कोण ?

**घोरपडे**– मी ? तुम्हा सर्वांचा बाप. इन्स्पेक्टर देशमुख, थोडी जरी गडबड कराल तर गोळीला बळी पडाल. ग्रामपंचायतीला चारी बाजूनी पोलिसांनी

वेढा टाकलेला आहे हे लक्षात ठेवा. जे सत्य गेली तीन वर्षं पोलिसांपासून लपवून ठेवलं होतं ते- सारं काही तुमच्या आवाजात मी या टेप-रेकॉर्डमध्ये टेप करून घेतलेले आहे. मी तुम्हा सर्वांना अटक केलेली आहे श्रीयुत सदा गबाळे पोलिस खातं आपलं अत्यंत आभारी आहे. गेल्या तीन वर्षांपासून या केसच्या तपासात आमचं खातं काम करीत होतं. परंतु प्रत्यक्ष पुरावा हाती न आल्यामुळे आम्हास काहीच करता आलं नाही. तुम्हा लोकाचा फड या गावात आला हा मी एक योगायोग मानतो. तुमच्या फडात काम करणाऱ्या कल्पनाबाईचं रूप आणि श्रीयुत सत्यशोधकाच्या स्वर्गवासी पत्नीचं स्वरूप जवळ जवळ सारखंच असल्यामुळे सत्यशोधकांना आपल्या मृत्युची खरी बातमी पोलिसांना देण्याची उपरती झाली व पोलिसांना तपासाचा एक नवा धागा मिळाला. काल-परवापर्यंत वीष घेऊन आत्महत्या म्हणूण नोंद केलेली केस ही समाज्यातील प्रतिष्ठीत लोकांनी सत्याची भाषा बंद करण्यासाठी केलेली अत्यंत घृणीत कृती आहे. हे आता आम्हास साऱ्या जगापुढे मांडता येईल. माझं खातं तुमच्या सहकार्याबद्दल निश्चित ऋणी राहील. हवालदार ..

(जो स्टेजवर येत नाही) ह्यांच्या हातात बेड्या घालून ह्यांची गावातून धिंड काढा आणि सरळ डी. एस्. पी. साहेबांच्याकडे घेऊन चला (इन्स्पेक्टर देशमुख जेव्हा सर्व आरोपींना घेऊन जायला निघतात तेव्हा सदा गबाळे पुढे होऊन घोरपड्यानी अॅडव्हान्स म्हणून उधळलेली पैशांची बंडळ. त्यांना परत करतो तो बोलण्याचा प्रयत्न करतो पण बोलू शकत नाही. इन्स्पेक्टरांच्या बरोबर सत्यशोधक पण निघून जातात. सदाच्या चेहऱ्यावर वचनभंग केल्याचा पश्चाताप आहे.कल्पना त्याला उद्देशून बोलते.)

**कल्पना**-- शाहीरा शेवटी तू हरलास, कोणत्याही संकटाच्या काळी मी तुझ्या सत्य रूपाचे रहस्य जगाला सांगणार नाही, हा दिलेला शब्द तू पाळला नाहीस. (शाहीराच्या डोळ्यातून पाणी येते तो बोलण्याचा प्रयत्न करतो पण शब्द बाहेर येत नाही. शेवटी कल्पना त्याच्या पाठीवर हात ठेवून) शांत हो शाहीरा शांत हो, मला माहीत आहे माझ्यावरच्या प्रेमाने तुला वचनभंग करण्याचे साहस करायला लावले. तुला तुझ्या वाणीपेक्षा माझ्या शीलाची किंमत जास्त वाटली शाहीरा, तुझ्या या वचनभंगातून

नियतं ने मला एक विश्वासाचा मित्र दिला. मी प्रसन्न आहे तुझ्या वचन भंगावर. काळजी करू नकोस. मी माझी अट मागे घेते. आणि तुझी वाणी तुला परत देते. बोल, तुला बोलता येईल.

**सदा**– मला क्षमा कर.

**कल्पना**– वेड्या, शाहीरा. अरे तू माझा शाहीर, मी तुझी कल्पना. कुणी कुणाला क्षमा करायची (त्याचवेळी छगन आणि मगन दारातून बोलतात.)

**छगन**– काय सदाभाऊ ? बर आहे ना ? नाही म्हटलं काय मदत बिदत लागली तर आम्हाला सांगा.

**सदा**– पण मी म्हणतो तुम्ही तुमची थोबाडं घेऊन गेला होता कुठं ?

**छगन**- कुठं नाही.

**सदा**– मग मी हाक मारली तेव्हा होता कुठं ?

**छगन**– वर छपरावर.

**सदा** - तिथं काय करत हुता.

**छगन**- युद्ध क्षेत्राची पहाणी करीत होतो.

**सदा**-- इथं आमच्या तोंडचं पाणी पळायची वेळ आली हुती. त्याचं काय ?

**छगन**– अन् वर छपरावर आमी काय सुखात होतो व्हय, तुमच्या तोंडचं पाणी पळालं होतं– तर मगन्याच्या धोतरात पाऊस पडायची वेळ आली हुती. मी मोठ्या मुष्कीलीनं त्याला थोपऊन धरला. मी म्हणालो गाढवा असं काय करशील तर आपण कुठं आहे हे पाटलाला कळलं. अन् तो रागाच्या भरात आपल्याला नेऊन उसाच्या चरकात पिळेल.

**सदा**-- बाकी संकटाच्या येळेला कुणी विश्वास तुमच्यावर ठेवावा. (त्याचवेळी सत्यशोधकाचा प्रवेश) नाही तुम्ही त्याला मातीत घातलं तर माझं नाव बदलून ठेवा. ह्या सत्यशोधकानं बग एकटा माणूस शेवटपर्यंत गावासंग लढला. सगळं काही भागलं पण सत्य नाही मोडलं. नाहीतर तुम्ही ?

**सत्य.**– श्रीयुत सदा गबाळे आणि कल्पनाबाई मी तुमचा अत्यंत आभारी आहे तुम्ही इथं आलात आणि मला माझ्या पापातून मुक्त केलंत.

**सदा**– तुमचं कोणतं पाप ?

**सत्य.**– ज्यावेळी माझी पार्वती माझ्या डोळ्यादेखत या नरपशुच्या निचकृत्याला बळी पडली त्यावेळी मी बेशुद्ध होतो. या हारामखोरानी बळ-

जबरीने मला त्या अवस्थेत तिला विष पाजायला लावले. बिचाऱ्या पार्वतीला आपला अंत कसा झाला ते कळलं सुद्धा नाही. आता शेवटी एक विनंती आहे. कल्पनाबाई तुम्हाला. ती तुम्ही मान्य करावी अशी माझी इच्छा आहे.

**कल्पना**– बोला.

**सत्य.**– पार्वतीबाईची आठवण म्हणून तिचे काय दागिने आहेत ते दागिने मी आपणास देऊ इच्छितो. कारण त्या दागिन्याचा मला आता काही उपयोग नाही. हे दागिने देत असताना माझ्या मनात कोणताही अपवित्र भाव नाही. किंवा तुमच्याकडून कसल्याही प्रकारची अपेक्षा नाही. तेव्हा माझी ही विनंती आपण मान्य करावी. तुम्ही नाही म्हणू नका तुम्ही हे दागिने घेतल्याने मला व माझ्या पार्वतीला समाधान मिळेल.

**कल्पना**-- घेणं किंवा न घेणं, हा माझा अधिकार नसून तो गबाळेचा आहे.

**सत्य**-- बोला गबाळे, तुम्ही नाही म्हणू नका.

**सदा**– आम्ही तुमचं दागिनं घेऊ पण एका अटीवर.

**सत्य.**– बोला, कोणत्या ?

**सदा**– आम्ही इथं आल्यापासून ज्या ज्या घटना घडल्या अन् त्या घटनामुळं या पापीलोकांचं पापाचं माप कसं भरलं हे समद्या जगाला समजावून सांगायची मला परवानगी द्या. मी ही कथा एका वगात बांधतो आन् गांवोगांव जाऊनशान या लोकांच्या अब्रुचे धिडवडे काढतो. याच्या पुढच्या सात पिढ्या वाईट मार्गानं चालणार न्हाईत याचा त्याना धडा देतो.

**सत्य.**-- मला मंजूर आहे तुमची अट. ही घ्या माझ्या पार्वतीच्या आठवणीची अखेरची भेट घेतो मी. (सत्यशोधक निघून जातो.)

**सदा**-- छगन, आता आपल्याला इथला मुक्काम हलवायला हवा. कल्पना तू म्हणालीस तेच खरे झाले. भेटलेला प्रत्येक माणूस आपल्या वगाची कथा वाढवत गेला आणि पापाचं माप भरलं ही अमर कथा तयार झाली. छगन मगन जरा इकडे या. तुम्ही एक काम करा. उद्याच्या उद्या तुम्ही गावाला परत जा. अन् आपल्या मागच्या फडातील सारी कलाकार मंडळी जिथं भेटतील तिथून त्यासनी घेऊन या. त्याना सांग सदाभाऊ गबाळेनं आपला फड उभा केलाय म्हणून.

**छगन**– हा निरोप वैजयंताला पण सांगायचा.

**सदा**– नको.

**कल्पना**-- ही वैजयंता कोण ?

**सदा**– आमच्या मागच्या फडाची नायिका.

**कल्पना**-- मग तिला का निरोप सांगायचा नाही ?

**सदा**-- कारण तिची जागा आता तू घेतलीस.

**कल्पना**-- म्हणून काय झालं. आपण तिला विसरून जायचं ? वैजयंताला पण निरोप द्या आन् येताना बरोबर घेऊन या.

**छगन**– मी म्हणतो सदाभाऊ ओरजनील कलाकार आपल्या फडात घेतलं तर काय होईल.

**सदा**– म्हणायचंय काय तुला.

**छगन**– रोज रात्री नऊ वाजता खेळ सुरू व्हायच्या एक तास अगोदर पोलिसाना सांगूनशान रंगराव रानबोके, दौलतराव पाटील, गोडबोले मास्तर व गबरू ह्यास्नी प्रयोगापुरते चार तास तुरुंगातून घेऊन यायचं आन् खेळ झाला की परत करायचं.

**सदा**– अन् त्येच्या जामीनला आपण राह्यचं तुझं डोस्क कुठं आनि केव्हा पळलं त्याचा नेम न्हाई.

**सगन**– पन पुन्हा आपन भेटायचं कुठं ?

**सदा**– खंडोबाच्या पालीला देवाची लग्न आठ दिवसावर आलीत जिथं आपला बंद पडला तिथूनच आपन आपला नवा फड उभा करयचा.

**छगन**– ठीक हाय. आम्ही सकाळच्या गाडीला पाय देतो पन एक शंका हाय.

**सदा**.– कसली ?

**छगन**– शंका हाय पन माजी नाय सगन्याची.

**सदा**-- मग त्याला सांगायला तोंड न्हाय ?

**छगन**– त्याला लाज वाटते.

**सदा**– आन् तू सगळी सोडलीस ?

**सगन**– माझी कसली शंका न्हाय.

**छगन**– सगन्या, गाढवा तुझ्या जिभेला काही हाड बिड हाय का न्हाय ? मगाशी मनातल्या मनात तू मला म्हनाला नायस्का ?

**सदा**– मनातल्या मनात तो तुला काय म्हणाला ?

**छगन**– चार दिवसाची रजा द्या. तिकडं लई खाडं झाल्याती.

**सदा**– असं तो म्हणाला ? आन् आता तुला न्हाई का काही म्हनायचं ?

**छगन**– म्हनायचंय तर. नाही कसं ? मी म्हणतो फडाची जुळवा जुळव होईपर्यंत तुम्ही दोघं बी चार दिवस रजा घ्या. आन् ज्या रातीच्या कामाला इश्रांती मिळाली त्याना कामाला लावा.

**सदा**– आता जा आन् खालवर घालून झोप.

**छगन**– ते करतोच. चल र सगन्या. पन तुमी झोपू नका. जागच रहा.

(ते जातात तेव्हा स्टेज अंधारात बुडून जात पुन्हा जेव्हा स्टेजवर प्रकाश येतो तेव्हा दृश्य पहिल्या अंकातल्या सुरवातीचं आहे. जो दगड दुभंगून कल्पना बाहेर आली. तो दगड. कल्पना आणि सदा गबाळे )

**सदा**– इथं का घेऊन आलीस मला ?

**कल्पना**– निरोप घ्यायला.

**सदा**– निरोप ? मी समजलो नाही.

**कल्पना**– मला आता जायला हवं.

**सदा**– कुठं ?

**कल्पना**– मुक्त व्हायला, मला आता मुक्ती मिळणार.

**सदा**– कसली मुक्ती ?

**कल्पना**– आत्म्याची.

**सदा**– आत्म्याची मुक्ती ? मला समजेल असं सांग.

**कल्पना**– शाहीरा, हेच ते ठिकाण, जिथे तुझी माझी प्रथम भेट झाली. त्यावेळी तू तुझं सारं वैभव हरवून बसला होतास. तुझ्यातला कलाकार कलेपासून दूर फेकला होता. त्यावेळी तुला मदतीचा हात हवा होता, जो तुला कलेच्या सागरात घेऊन जाऊ शकेल. त्याचवेळी मी इथं प्रगट झाले. आता प्रश्न उरतो तो म्हणजे मी कोण ? शाहीरा मी तुला फसवू इच्छित नाही. मी कुणी देवी नाही. कुणी जगदंबा नाही. मी आहे एक मृतात्मा.

**सदा**– मृतात्मा ! म्हणजे भूत.

**कल्पना**– तू मला काही ही म्हण. पण मी मृतात्मा आहे. जी कथा तुझ्या-ओळखीनंतर घडली, त्या कथेची मी नायिका आहे. स्पष्ट सांगायचं म्हणजे मी सत्यशोधकाच्या पार्वतीचा मृतात्मा आहे. सत्यशोधकाचं माझ्यावर

जीवापाड प्रेम होतं. पण समाजातल्या समाजकंटकांना ते पहावलं नाही. सत्यशोधकाचा त्याना बदला घ्यायचा होता. त्यासाठी त्यानी सत्यशोधकाला जीवनातून उठवलं आणि मला मृत्यूच्या खाईत लोटून दिलं. सत्याला वाचा फोडण्यासाठी त्याने डरपोक मेहनत केली पण ती सारी वाया गेली. सत्य-शोधकाचा आत्मा सत्यासाठी तीळ तीळ तुटत राहिला. पण त्याला यश आलं नाही. शेवटी त्याची धर्मपत्नी या नात्याने मी त्याला मदत करण्या-साठी हे रुप धारण केलं योगायोगानं तुझी गाठ पडली आणि पुढची कथा घडून सत्यशोधकाला न्याय मिळाला व मला मुक्ती.

मी तुझी अनंत आभारी आहे. कारण तू माझ्याशी प्रामाणिक राहीलास. माझ्या रूपाचा, माझ्या तारुण्यांचा, तू कधीही फायदा घेण्याचा प्रयत्न केला नाहीस. मला माहीत आहे. तुझं माझ्यावर प्रेम आहे. पण या रुपात मी त्याचा स्वीकार करु शकत नाही. कारण मी सत्य शोधकाच्या धर्मपत्नीची सावली आहे. तिच्यावर त्याचा अधिकार आहे आठवतं तुला ? मी तुला वचन दिलं होतं जर तू मी सांगेन तशी कथा वगात बांधून जनतेपुढे सादर करशील तर मी तुला तुझा फड उभा करण्यासाठी लागणारी पैशांची मदत करीन. शाहीरा मला माफ कर रोख रकमेत मी तुला पैसे देऊ शकत नाही. पण सत्यशोधकाने दिलेले दागिने मी तुला देणार आहे. खऱ्या अर्थाने त्या दागिन्यावर माझा हक्क आहे. तू त्याचा स्वीकार कर. आणि मी दिलेल्या वचनातून मला मुक्त कर.

वेड्या डोळ्यात पाणी नाही आणायचं. खूप मोठं व्हायचं. जगाला हसवायचं. रडायचं ते मनातल्या मनात. कलाकाराच्या अश्रुना डोळ्यात दिसण्याचा अधिकार नसतो. तेव्हा मला हसत हसत निरोप दे. मी जाता जाता तुला एक वचन देते. पुढच्या जन्मात मी तुझ्या मनाच्या फडाची मालकीण होईन. माझ्यावर विश्वास ठेव ज्या ज्या वेळी तू माझं स्मरण करशील त्या त्या वेळी कविच्या कल्पनेप्रमाणे मी तुझी सोबत करीन. येते मी. आता मला जायलाच हव (असे म्हणून पुन्हा एक भयंकर आवाज होतो आणि कल्पना त्या भग्न शीलाखंडात नाहीशी होते. शीलाखंड पुन्हा एकरुप होत असताना पडदा पडतो शाहीर शीलाखंडाला नमस्कार करीत असतो.)

समाप्त



ग्रं ... ालय शाखा.
दा. क्र. १८७०१
दि. ७/१२/८५ ............

सदा गबाळे